RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

३ मंगळवार फेब्रुवारी २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २४९

✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

## आठवड्यातील मंगळवारची कॅबिनेट बैठक रद्द

■ मुंबई : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने राष्ट्रवादीसह राज्याच्या राजकारणातही मोठा बदल झाल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या सुरू असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांतही या दुर्घटनेचा आणि अजित पवारांच्या नसण्याचा परिणाम होईल, अशी चर्चा स्थानिक स्तरावर होत आहे. दुसरीकडे पवार कुटुंबीय देखील दुःखातून सावरत राजकीय पाऊले टाकत आहेत. उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा यांनी आज साता-याच्या कराडमधील प्रितीसंगम येथे जाऊन यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच, अजित पवारांसमवेत विमान दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या सुरक्षा रक्षक विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यामुळे, आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मंत्रालयात कधी जाणार याची माहिती समोर आली आहे.

## कारच्या धडकेत शिंदे सेनेचे तालुका उपप्रमुख ठार

**▸विदर्भ केसरी। केज :**

अंबाजोगाई रस्त्यावर ढाकेफळ शिवारातील हॉटेल कारभारी समोर भरधाव कारने दुचाकीला जोराची धडक दिलेल्या या अपघातात दुचाकीवरील शिवसेनेचे (एकनाथ शिंदे गट) केज तालुका उपप्रमुख चंद्रकांत शहाजी इंगळे (वय ५० रा. सादोळा) हे जागीच ठार झाल्याची घटना रविवारी (दि. १) सायंकाळी सहा वाजता घडली. सादोळा (ता. केज) येथील चंद्रकांत शहाजी इंगळे (वय ५०) हे शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) केज तालुका उपप्रमुख होते. ते रविवारी पिसेगाव येथे रेणुका देवीच्या यात्रेत दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन पिसेगाव येथून परत सादोळा या गावी दुचाकीवरून (एम. एच. ४४ एसी ६९३१) निघाले होते.

## वाहनाला दुचाकीची धडकः अर्जुनीचा तरुण ठार

**▸विदर्भ केसरी। निपाणी:**

पुढे निघालेल्या अज्ञात वाहनाला मागून दुचाकीची धडक बसून झालेला अपघातात दुचाकीस्वार युवक शेतकरी प्रकाश सदाशिव मिसाळ (वय २६, रा.अर्जुनी ता.कागल) हा जागीच ठार झाला. तर दुचाकीवर मागे बसलेला त्याचा मित्र ओंकार बाळासाहेब चौगुले (वय २५) हा गंभीर जखमी झाला. हा अपघात रविवारी (दि.१) रात्री झाला. घटनेची नोंद शहर पोलिसात झाली आहे.

मृत प्रकाश मिसाळ व त्याचा मित्र ओंकार चौगुले हे दोघेजण निपाणी येथून आपले काम आटोपुन मूळगावी दुचाकीवरून जात होते. दरम्यान त्यांची दुचाकी निपाणी-मुरगुड रोडवर देवचंद कॉलेजवळ आली असता पुढे निघालेल्या अज्ञात वाहनाला दुचाकीस्वार प्रकाश मिसाळ याचा वाहनावरील ताबा सुटल्याने मागून जोराची धडक बसली. यामध्ये दोघेही खाली कोसळल्याने प्रकाश मिसाळ हा जागीच ठार झाला. तर जखमी ओंकार चौगुले याला तातडीने निपाणी येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दरम्यान अपघाताची माहिती घटनास्थळी उपनिरीक्षक शिवानंद कार्जोळ, हवालदार बसवराज नेर्ली यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी करून रितसर पंचनामा करून मयत युवकाची ओळख पटवून सीसीटीव्ही फुटेजच्या अज्ञात वाहनाचा शोध घेतला.याबाबत मयत प्रकाश मिसाळ याचा भाऊ आकाश सदाशिव मिसाळ यांनी रितसर फिर्याद दिली आहे.

# अमेरिकेने टॅरिफ घटवले

### व्यापार कोंडी फुटली : ५० टक्क्यांवरून आता केवळ १८ टक्के

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली; वृत्तसंस्था :**



भारताने युरोपियन युनियनबरोबर नुकत्याच केलेल्या महत्त्वाकांक्षी कराराच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी अमेरिका आणि भारत यांच्यात व्यापार करार अंतिम झाल्याची घोषणा केली. त्याचवेळी ट्रम्प यांनी भारतावरील टॅरिफ 50 टक्क्यांवरून कमी करून 18 टक्के करण्यात येत असल्याचे सांगितले.

अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार कराराअंतर्गत दोन्ही देश प्रतिपूर्ती शुल्कात कपात करणार आहेत. भारत अमेरिकेविरोधातील प्रतिपूर्ती शुल्क आणि गैरशुल्क अडथळे (नॉन टॅरिफ बॅरिअर्स) शून्यावर आणण्याच्या दिशेने पुढे पाऊल टाकेल. अमेरिकेने भारतावरील शुल्क 50 टक्क्यांवरून 18 टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतल्याचेही स्पष्ट केले. ट्रम्प यांनी शुल्क कपातीची घोषणा करण्यापूर्वी, भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी, दोन्ही नेत्यांमध्ये दूरध्वनी संभाषण झाल्याचे सांगितले. तशी पोस्ट त्यांनी सोशल मीडियावर केली होती.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदी यांच्याशी नुकताच संवाद साधला. पुढील घडामोडींसाठी स्टे ट्यून, असे गोर यांनी या घडामोडीआधी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले होते. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेच्या तीन दिवसांच्या दौऱ्याला सुरुवात केलेल्या दिवशीच शुल्क कपातीची घोषणा झाली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून दोन्ही देशांदरम्यान तणाव कमी करण्यासाठी आणि प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करार अंतिम करण्याच्या दिशेने पुढे पाऊल टाकण्यासाठी प्रयत्न सुरू होते. जयशंकर यांचा अमेरिकेचा दौराही प्रामुख्याने याच पार्श्वभूमीवर नियोजित असल्याचे बोलले जात आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, जयशंकर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली आयोजित महत्त्वाच्या खनिजांच्या पुरवठा साखळीवरील मंत्रिस्तरीय बैठकीसाठी अमेरिकेला भेट देत आहेत.

दरम्यान, भारताकडून रशियन कच्च्या तेलाच्या खरेदीवर 25 टक्के अतिरिक्त शुल्कासह भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क एकूण 50 टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आल्यानंतर भारत-अमेरिका संबंध ताणले होते. भारतावर ट्रम्प यांनी लादलेल्या कठोर शुल्कानंतर भारत आणि अमेरिका यांच्यात संभाव्य व्यापार कराराबाबत चर्चांना उधाण आलेले असताना झालेली ही घडामोड महत्त्वाची मानली जात आहे.

# पक्ष विलिनीकरणाची चर्चा नोव्हेंबरपासूनच

**▸विदर्भ केसरी।नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन राष्ट्रवादीच्या एकत्र येण्याची चर्चा जोरात रंगली असून दोन्ही पक्षातील वरिष्ठ नेत्यांकडून वेगवेगळी मते मांडली जात आहेत. मात्र, शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांकडून अजित पवारांची इच्छा ही एकत्र येण्याची होती, असे ठामपणे सांगितले जात आहे. शरद पवारांनीही या वृत्ताला दुजोरा दिला.

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अजित पवार यांना काका शरद पवार यांच्यापासून सोडून गेल्याचा डाग पुसायचा होता. तसेच बहीण सुप्रिया सुळे यांच्याशी असलेले नाते कायम ठेवायचे होते. त्यातूनच दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचाली गतिमान झाल्याचे सांगण्यात येत होते. परंतु राष्ट्रवादीतील नेत्यांचीच अजित पवारांना मदत मिळत नव्हती, अशी माहिती समोर आली आहे.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला थेट एनडीएसोबत जाता येत होते. त्यामुळे इंडिया आघाडीला मोठा झटका बसला असता. मात्र, कुटुंब एक झाले नसते. त्यामुळे दोन्ही बाजूंनी कुटुंब एक होणे गरजेचे होते. अजित पवार यांना पक्ष चालवताना सध्याच्या राष्ट्रवादीच्या नेत्यांची फारशी मदत होत नव्हती. पुणे आणि पिंपरी-चिंचवड असो की विधानसभा निवडणूक असो अजित पवार यांच्या पक्षाच्या नेत्यांनी फार मदत केली नव्हती, अशीही विश्वसनीय नेत्यांची माहिती आहे.

दोन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्यासंदर्भात कधी केव्हा काय चर्चा झाली, यासंदर्भाने महत्त्वाची माहिती समोर आली. नागपूर अधिवेशनात नोव्हेंबर २०२४ नंतर या चर्चेला सुरूवात झाली. जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यात अनेक बैठका झाल्या. देवेंद्र फडणवीस यांना सांगण्यात आले तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी मला वर बोलावे लागेल, असेही सांगितले होते. त्यानंतर ५ ऑक्टोबर २०२५ रोजी अजित पवार यांनी अहिल्यानगर येथे अमित शाह यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करून सांगतो असे सांगितले तर १४ नोव्हेंबर २०२५ रोजी पंतप्रधानांकडून ग्रीन सिंग्नल मिळाला आणि मुख्यमंत्र्यांशी बोलून घ्या, असे म्हटले. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी मी वरती बोलतो आणि सांगतो, असे सांगितले होते, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

## सामाजिक कार्यकर्त्याला चापडोह घाटात लुटले

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

समाज प्रबोधनासाठी सायकलने भारत भ्रमण करणाऱ्या पुणे येथील एका सामाजिक कार्यकर्त्याला रस्त्यात अडवून लुटले. यवतमाळ-घाटंजी रोडवरील चापडोह घाटात रविवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली.

सुशील रामभाऊ बोबडे (वय ५१) असे तक्रारकर्त्याचे नाव आहे. ते सायकलने भारत भ्रमण करून समाज प्रबोधनाचे काम करतात. रविवारी घाटंजी येथील कार्यक्रम आटोपून सुशील हे सायकलने यवतमाळकडे येत होते. दरम्यान, रात्री ९.३० वाजताच्या सुमारास चापडोह घाटात येताच दुचाकीवरून आलेल्या तीन तरुणांनी त्यांना अडवले. पेट्रोल भरण्यासाठी पैशाची मागणी केली. मात्र, बोबडे यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर एका आरोपीने त्यांच्या हातातील सात हजार रुपये किंमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला. अंधाराचा फायदा घेत तिघेही दुचाकीवरून पसार झाले. घटनेनंतर बोबडे यांनी पोलिसांना माहिती दिली. याप्रकरणी अवधूतवाडी पोलिसानी अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## खासदार मनोज तिवारी यांच्या ताफ्यातील एस्कॉर्ट वाहनाच्या धडकेत रिक्षाचा चक्काचूर

**▸विदर्भ केसरी। जळगाव :**



शहरात एकीकडे खड्यांचे साम्राज्य आणि दुसरीकडे व्हीआयपींच्या सुरक्षेसाठी सुसाट धावणारी वाहने, या दुहेरी कात्रीत सोमवारी जळगावकर सापडले. भाजप खासदार मनोज तिवारी यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलीस एस्कॉर्ट वाहनाने मेहरूण तलाव परिसरात एका प्रवासी रिक्षेला जोरदार धडक दिली. खड्डा वाचवण्याच्या प्रयत्नात चालकाचे वेगावरील नियंत्रण सुटल्याने हा भीषण अपघात झाला असून, यामध्ये चिमुरडीसह ७ ते ८ जण जखमी झाले आहेत.

भाजपचे खासदार मनोज तिवारी हे एका धार्मिक कार्यक्रमासाठी पारोळा येथे आले होते. तिवारी यांना 'वाय प्लस' सुरक्षा असल्याने जळगाव जिल्हा पोलिसांकडून त्यांना एस्कॉर्ट वाहन पुरवण्यात आले होते.

कार्यक्रम आटोपून हे वाहन परतत असताना सोमवारी मेहरूण तलाव परिसरात हा अपघात झाला. शिरसोली रस्त्यावरील जीवघेणे खड्डे चुकवण्याच्या नादात पोलीस वाहनाचा वेग अनियंत्रित झाला आणि समोरून येणाऱ्या रिक्षेला (MH 19 V 6197) या वाहनाने जोरदार धडक दिली.

## बसला कंटेनरची धडक



**▸विदर्भ केसरी। नवापूर :**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ असलेल्या नवापूर तालुक्यातील कोंडाईबारी घाटात काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली. महामार्गावरील पोलिस चौकीजवळ उभ्या असलेल्या एसटी बसला मागून येणा-या भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली.यावेळेस या बसमधून १५ प्रवासी प्रवास करत असल्याची माहिती आहे. या भीषण धडकेमुळे बस समोर उभ्या असलेल्या ट्रकवर आदळली आणि दोन अवजड वाहनांच्या मध्ये अक्षरशः चिरडली गेली. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झालेली नाही. हा अपघात इतका भयानक होता की, समोरच्या ट्रकचा १० ते १२ फुटांचा लोखंडी रॉड अँगल.बसचे लोखंडी पत्रे फाडून थेट केबिनमध्ये घुसला. यामुळे बसच्या पुढील भागाचा चेंदामेंदा झाला असून चालक महेंद्र लांजा गावित यांचा पाय केबिनमध्ये अडकून पडला होता.

## १४ वर्षीय मुलीवर तीन अल्पवयीन मुलांकडून सामूहिक बलात्कार

**▸विदर्भ केसरी। सावनेर (नागपूर)**

नात्याला काळिमा फासणारी आणि माणुसकीला लाजवणारी एक घृणास्पद घटना सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सरोदी टोला (तेलगाव कामठी) येथे उघडकीस आली आहे. अवघ्या १४ वर्षांच्या मुलीवर तिच्याच दूरच्या नातेवाईक असलेल्या तीन अल्पवयीन मुलांनी वारंवार अत्याचार केल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि तिन्ही आरोपी एकाच गावातील रहिवासी असून एकमेकांचे दूरचे नातेवाईक आहेत. या नराधमांनी केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडितेचे अश्लील व्हिडिओ देखील बनवले. हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला वारंवार ब्लॅकमेल करण्यात आले आणि तिचे शारीरिक शोषण करण्यात आले. पीडितेने धीर धरून सावनेर पोलिसांत धाव घेतली, घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२) (m), ६५(१), ७०(२), ३५१(४) आणि सह पोक्सो (POCSO) कायद्याच्या कलम ६६ (e) व ६७ (b) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामीण नागपूरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेरचे ठाणेदार उमेष पाटील पुढील तपास करत आहेत.आरोपींची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली. पोलिसांनी तिन्ही अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेऊन सावनेर न्यायालयात हजर केले. मात्र, आरोपी अल्पवयीन असल्याने न्यायालयाने त्यांना नागपूर येथील बालसुधारगृहात पाठवण्याचे आदेश दिले आहेत.

■ **ही घटना समाजातील एका भीषण वास्तवाकडे बोट दाखवते. १४ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करणारे आरोपी केवळ 'अल्पवयीन' आहेत म्हणून कडक शिक्षेपासून वाचणार का? वारंवार होणारे असे गुन्हे आणि त्यांना मिळणारी मवाळ वागणूक यामुळे गुन्हेगारांचे**

# अजित पवारांचा मृत्यू संशयास्पद : संजय राऊत

**▸विदर्भ केसरी।**

संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चा सत्रात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघाताचा मुद्दा उपस्थित करत या विमान अपघाताची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच केंद्र सरकारवर जोरदार आरोप केले.

आज मला अजित पवारांची आठवण येत आहे. त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आम्ही सगळे अजूनही धक्क्यात आहोत, आम्हाला अजूनही कळत नाहीये की हे झाले कसे? अजित पवारांवर 70 हजार कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप सरकारने केला होता. पण ते भारतीय जनता पक्षासोबत आले आणि पवित्र झाले, अशी टीका संजय राऊत यांनी केली.



पुढे संजय राऊत म्हणाले, 15 जानेवारी रोजी अजित पवारांनी एक वक्तव्य केले होते आणि भाजपला उद्देशून म्हटले होते की 'माझ्यावर सिंचन घोटाळ्याचा आरोप करत असाल तर त्यातला पैसा फक्त आम्हीच नाही खाल्ला, भाजपने सुद्धा या घोटाळ्यात पैसा खाल्ला आहे आणि त्यांची फाइल सुद्धा माझ्याकडे आहे'. हे त्यांनी 15 जानेवारी रोजी म्हटले होते आणि 10 दिवसांनी अजित पवारांचा विमान दुर्घटनेत मृत्यू झाला. मी आरोप करत नाहीये, पण हा मृत्यू संशयास्पद आहे.

■ **संजय राऊत म्हणाले, अजित पवार हे नेहमी ती फाइल सोबत ठेवत होते. ते जेव्हा मुंबईहून निघाले होते, तेव्हा सुद्धा ती फाइल त्यांच्या सोबत होती. त्यानंतर अर्ध्या तासात त्यांचा मृत्यू होतो. याची चौकशी झाली पाहिजे. आता तर मला जस्टीस लोया यांची सुद्धा आठवण आली आहे. अजित पवारांचा मृत्यू पाहिल्यानंतर जस्टीस लोया यांची आठवण आली, असे म्हणत संजय राऊत यांनी सरकारला आरोप केले.**

■ **संजय राऊत यांनी संसदेत बोलताना सरकारवर देखील जोरदार आरोप केले. हे सरकार बेजबाबदार आहे. लोकशाही या देशात आता राहिलेली नाही. न्यायालय असो किंवा निवडणूक आयोग या सरकारी कंपन्या बनल्या आहेत. सोनम वांगचूक कुठे आहे? त्यांचा अपराध काय आहे? त्यांनी सांगितले होते की आमची जमीन चीनने घेतली, तर त्यांना राष्ट्रद्रोही ठरवत तुरुंगात टाकले. कुठे आहे लोकशाही? असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला.**

# यवतमाळ जिल्ह्यात जन्म दाखल्यांचा महाघोटाळा

### 1500 लोकसंख्येच्या गावात 27 हजार जन्मांच्या नोंदी, 11 आरोपींना अटक; आज किरीट सोमय्यांचा दौरा

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील शेंदूरसणी या छोट्याशा गावातून समोर आलेल्या २७ हजार ३४९ बनावट जन्म प्रमाणपत्र घोटाळ्याने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, राज्याच्या गृहविभागाने विशेष तपास पथकाची (SIT) नियुक्ती केली असून, एसआयटीने या प्रकरणी ११ आरोपींना अटक केली आहे.

बनावट जन्म दाखला घोटाळ्यातील 2 आरोपी अद्याप फरार असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. या पार्श्वभूमीवर भाजप नेते किरीट सोमय्या उद्या (मंगळवार) यवतमाळ दौऱ्यावर येत आहेत.



शेंदूरसणी गावाची एकूण लोकसंख्या अवघी दीड हजार आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांत ग्रामपंचायतीच्या 'सीआरएस' (Civil Registration System) पोर्टलवर तब्बल 27 हजार 349 जन्म आणि 11 मृत्यूच्या संशयास्पद नोंदी आढळल्या. तांत्रिक तपासणीत असे समोर आले की, या ग्रामपंचायतीचा लॉगिन आयडी चक्क मुंबईतून वापरला जात होता आणि मुख्य सर्व्हर हॅक करून या नोंदी करण्यात आल्या होत्या.

या घोटाळ्याचे धागेदोरे बिहारपर्यंत पोहोचले आहेत. या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार आणि सरकारी पोर्टल हॅक करणारा मास्टरमाइंड बिहारमधून पकडण्यात आला आहे. पोलिसांनी आतापर्यंत तबीश असगर अली, अभिजित मोरे, संतोष सूर्यवंशी यांच्यासह एकूण 11 आरोपींना अटक केली आहे. उर्वरित 2 मुख्य आरोपी अद्याप फरार असून, त्यांच्या अटकेसाठी पोलिसांनी छापेमारी सुरू केली आहे. राज्याच्या सायबर विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक यशस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील 'एसआयटी' या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे.

### किरीट सोमय्यांचा यवतमाळ दौरा

■ **बनावट जन्म प्रमाणपत्रांविरोधात किरीट सोमय्या यांनी पहिल्यापासूनच आक्रमक भूमिका घेतली आहे. यापूर्वीही त्यांनी मालेगाव, छत्रपती संभाजीनगर, सिल्लोड इत्यादी ठिकाणी भेट देऊन या घोटाळ्याप्रकरणी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. आता किरीट सोमय्या उद्या यवतमाळला भेट देऊन जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांशी चर्चा करणार आहेत. यासंदर्भात किरीट सोमय्या यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट करून माहिती दिली आहे.**

# मेफेड्रॉन प्रकरणी चार युवक अटकेत

### चौघांनाही न्यायालयीन कोठडी : डिआरआयचा तपास सुरूच

**▸विदर्भ केसरी। अमरावती,**

महसूल गुप्तचर संचालनालयाने (डिआरआय) रविवारी दुपारी अमरावती शहरात गुप्त महितीवरून सुमारे ४ किलो ९०० ग्रॅम एमडी mephedrone case (मेफेड्रॉन) जप्त केले होते.

या प्रकरणी त्यांनी चार युवकांना अटक केली आहे. त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. आवेज आरिफ अहमद (२५), मुस्तकीन खान अब्दुल ताहेर खान (३०, दोघेही रा. चांदूर बाजार), परवेज शेख नासीर (३२) व फैजल खान अन्सार खान (२२, दोघेही रा. अमरावती) अशी डिआरआयने अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. हे चौघे रविवारी दुपारी एका कारमधून विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्जची तस्करी करणार असल्याची माहिती त्यांच्या मागावर असलेल्या डीआरआयच्या अहमदाबाद झोनच्या पथकाला मिळाली होती.

या माहितीच्या आधारावर सदर पथकाने रविवारी दुपारी शहरात दाखल होऊन नवसारी परिसरात एका डमी ग्राहकाच्या माध्यमातून त्यांना पकडले. अंगझडतीत त्यांच्यापैकी परवेज शेख नासीर याच्याजवळ ४ ग्रॅम गांजा आढळून आला. तर कारच्या झडतीत ४ किलो ९०२ ग्रॅम एमडी ड्रग्ज आढळून आले होते. त्यानंतर सदर पथक जप्त एमडी ड्रग्स व ताब्यात घेतलेल्या चारही आरोपींना घेऊन नवसारी परिसरातील जीएसटी भवनात दाखल झाले होते. विशेष म्हणजे, ही कारवाई करताना डीआरआयच्या पथकाने अत्यंत गोपनियता बाळगली होती. त्यामुळे स्थानिक पोलिसांनाही याबाबत कुठलीही माहिती नव्हती. दरम्यान, जीएसटी भवनात डीआरआयच्या पथकाने दिवसभर आरोपींची कसून चौकशी केली.


चौकशीअंती चारही आरोपींना स्थानिक न्यायालयासमोर हजर करण्यात आले. यावेळी डिआरआयच्या पथकाने चौघांचीही १६ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडीची मागणी केली. त्यावेळी न्यायालयाने चारही आरोपींना ४ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानुसार त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली. दरम्यान या प्रकरणात आरोपींच्यावतीने ॲड. मुर्तझा आझाद यांनी युक्तीवाद केला तर डिआरआयच्यावतीने नागपूर येथील ॲड. नालमवार यांनी बाजू मांडली.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ | २

# माहिती अधिकाराचा खेळखंडोबा

## माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने भ्रष्टाचाराचा संशय

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**



: चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र (CSTPS) येथील ओ.डी.पी. (ODP) विभागातून माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती वेळेवर देण्यास टाळाटाळ केली जात असल्याने प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महिना उलटूनही माहिती न मिळाल्याने अखेर अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले, मात्र तिथेही चालढकल होत असल्याने या प्रकरणामागे मोठे गौडबंगाल किंवा भ्रष्टाचाराचा संशय व्यक्त केला जात आहे. काय आहे नेमके प्रकरण? सामाजिक कार्यकर्ते प्रियदर्शन इंगळे यांनी २० नोव्हेंबर २०२५ रोजी माहिती अधि कार कायद्यांतर्गत ओ.डी.पी. विभागाशी संबंधित महत्त्वपूर्ण मा हि ती मागितली होती. कायद्यानुसार ३० दि वसांच्या आत माहिती देणे बंधन कारक असतानाही, संबंधित विभागाने माहिती दिली नाही. त्यामुळे इंगळे यांनी वरिष्ठ अपील अधिकाऱ्यांकडे धाव घेत अपील दाखल केले. मात्र, अपील दाखल करून २८ दिवस उलटले तरी अद्याप त्यावर सुनावणी किंवा माहिती देण्यात आलेली नाही. माहिती देण्यास होणारा हा विलंब 'माहिती अधिकार कायद्या'चे थेट उल्लंघन असल्याचे बोलले जात असून, या दिरंगाईमुळे संबंधित विभागात काहीतरी काळेबेरे असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

**■ प्रशासकीय बाजू:**

**■ "ओ.डी.पी. विभागाकडून आमच्याकडे वेळेवर माहिती प्राप्त झाली नव्हती, त्यामुळे आम्ही ती अर्जदाराला देऊ शकलो नाही. मात्र, आता आमच्याकडे माहिती उपलब्ध झाली असून येत्या एक-दोन दिवसांत ती मागणीकर्त्याला सुपूर्द करण्यात येईल."**
**— श्री. चेने, माहिती अधिकारी**

**■ कपिल निकाली काढण्यासाठी 30 दिवसाचा कायदेशीर कालावधी असतो त्यामुळे तिच्या आत अपील प्रक्रिया पूर्ण करून संबंधित माहिती सादर केली जाईल**
**- भूषण शिंदे अपील अधिकारी सिस्टप्स**

### पारदर्शकता की दडपशाही

**■ माहितीचा अधिकार हा सामान्य नागरिकांच्या हातातील एक अत्यंत प्रभावशाली शस्त्र आहे पण दुर्दैवाने जेव्हा आपण या क्षेत्राचा वापर करतो तेव्हा व्यवस्थेतील काही लोकांना त्यांची भीती वाटू लागते माझ्या बाबतीतही असाच काहीचा अनुभव आला झालेला प्रकार आणि माझे**
**निरीक्षण ओ डीपी संदर्भात रीतसर माहितीचा अधिकार टाकला होता त्यानुसार मला माहिती मिळणे अपेक्षित असताना दहा ते पंधरा दिवसांनी एका राठोड नावाच्या व्यक्तीचा मला फोन येतो माहिती देण्याऐवजी तुला ही माहिती कशाला हवी? असा उद्धट प्रश्न विचारतो मुळात आयटीआय कायद्यानुसार माहिती मागणाऱ्या ला कारण विचारणाचा अधिकार कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला नाही अशा प्रकारे फोन करून विचारणा करणे हे स्पष्टपणे दबाव टाकण्याचे लक्षण आहे किंवा कारभार पारदर्शक असतो तेव्हा कोणालाही भीती वाटण्याचे कारण नसते पण इथे ज्या पद्धतीने संवाद साधला गेला त्यावरून काहीतरी लपवण्याचा प्रयत्न होत आहे**
**प्रियदर्शन इंगळे माहिती अधिकारात माहिती मागणारा**

## अग्रलेख

# 'अल्कराझ पर्व'!

लॉन टेनिस जगतात आता स्पेनच्या कार्लोस अल्कराझ पर्वाला प्रारंभ झाला आहे. टेनिसचे वर्तमान आणि भविष्य म्हणून पाहिले जात असलेल्या स्पेनच्या कार्लोस अल्कराझने नवइतिहास रचताना सर्वांत कमी वयात चारही ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकण्याची (करियर स्लॅम) किमया साधली आहे. रविवारी झालेल्या अंतिम लढतीत अल्कराझने आपला आदर्श राफेल नदालच्या उपस्थितीत सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचचा ४ सेटमध्ये पराभव केला आणि कारकिर्दीत प्रथमच ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेचे जेतेपद पटकावले. टेनिस इतिहासातील सर्वकालीन सर्वोत्कृष्ट खेळाडूंपैकी एक जोकोविच आणि युवा पिढीतील तारांकित टेनिसपटू अल्कराझ यांच्यातील झुंज पाहणे ही एकप्रकारची मेजवानीच ठरणार होती. जोकोविचने पुरुष एकेरीत आतापर्यंत २४ ग्रँडस्लॅम जेतेपदे पटकावली आहेत त्यामुळे रविवारी आणखी एक जेतेपद जिंकून २५ एकेरी ग्रँडस्लॅम जेतेपदे मिळवणारा टेनिसपटू असा इतिहास रचण्याची ३८ वर्षीय जोकोविचला संधी होती. यामुळे अंतिम लढतीत जोकोविचचे पारडे जड वाटत होते.

नोव्हाकला २५ ग्रँडस्लॅम जिंकण्याचा मान मिळाला असता. महिलांमध्ये असा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या मार्गारेट कोर्टने केला आहे. स्पेनच्या अल्कराझलाही ऐतिहासिक कामगिरी खुणावत होती. २२ वर्षीय अल्कराझने आतापर्यंतच्या आपल्या कारकिर्दीत फ्रेंच, विम्बल्डन आणि अमेरिकन या ३ ग्रँडस्लॅम स्पर्धा प्रत्येकी २ वेळा जिंकल्या आहेत मात्र, ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेने त्याला हुलकावणी दिली होती. यंदा त्याने ऑस्ट्रेलियन स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. यामुळे मेलबर्न पार्कवर ही स्पर्धा जिंकून तो 'करिअर स्लॅम' पूर्ण करणारा सर्वांत युवा टेनिसपटू ठरणार का? याबाबत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. जोकोविच या स्पर्धेत या आधी १० वेळा अंतिम लढतीत खेळला होता आणि प्रत्येक वेळी तोच विजेता ठरला होता. यंदा मात्र जोकोविचला जेतेपदापासून वंचित राहावे लागले. अल्कराझविरुद्ध पहिला सेट जिंकूनही नोव्हाकला कामगिरीत सातत्य राखता आले नाही. नव्या दमाच्या अल्कराझने त्याला अंतिम लढतीत २-६, ६-२, ६-३, ७-५ असे ४ सेटमध्ये पराभूत केले. सुमारे ३ तास चाललेल्या अंतिम लढतीत प्रत्येक गुणासाठी दोन्ही टेनिसपटूत चुरस दिसून येत होती. दोघेही आपापली सर्व्हिस राखण्यासाठी जीवाची बाजी लावत होते. टेनिसमध्ये स्वतःची सर्व्हिस राखण्याला अतिशय महत्त्व असते. सर्व्हिस गमावली तर गेम गमावण्याचा धोका असतो. सामन्यात 'ॲडव्हान्टेज' मिळवण्यालाही महत्त्व असते. म्हणजे सर्व्हिस करणा-या विरुद्ध गेममध्ये ४०-४० अशा बरोबरीनंतर तुम्हाला ॲडव्हान्टेज मिळाला असल्यास आणि पुढचा गुण तुम्हीच जिंकल्यास तुम्हाला एका गेमचा आगाऊ लाभ मिळतो आणि ही सर्व्हिस करणा-यासाठी धोक्याची घंटा असते. नोव्हाक-कार्लोस यांच्यातील अंतिम लढतीत 'ॲडव्हान्टेज'चे प्रसंग अनेक वेळा आले. दोन्ही खेळाडूंनी दीर्घ रॅलिजवर अधिक भर दिला होता. कारण अंतिम फेरी गाठण्यापूर्वी उपान्त्य फेरीत त्यांची दमछाक झाली होती. अल्कराझने ५ तास २७ मिनिटे चाललेल्या उपान्त्य लढतीत जर्मनीच्या ॲलेक्झांडर झ्वेरेव वर ६-४, ७-६ (७-४), ६-७ (३-७), ६-७ (४-७), ७-५ अशी मात केली होती. दुस-या उपान्त्य लढतीत जोकोविचला सिन्नेरविरुद्ध विजयासाठी ४ तास ९ मिनिटे झगडावे लागले होते. नोव्हाकने २ वेळा पिछाडीवरून पुनरागमन करताना बाजी मारली होती. त्याने ही लढत ३-६, ६-३, ४-६, ६-४, ६-४ अशी जिंकली होती. यंदाच्या स्पर्धेत महिला एकेरीत कझाकस्तानच्या एलिना रायबाकिनाने माजी विजेत्या अग्रमानांकित अरिना सबालेन्कावर मात केली. एलिनाने ३ वर्षापूर्वीच्या अंतिम लढतीत झालेल्या पराभवाची परतफेडही केली. अंतिम लढतीत सबालेन्कावर ६-४, ४-६, ६-४ असा विजय मिळवत रायबाकिना 'टेनिस राणी' ठरली. यंदा पुरुष एकेरीच्या अंतिम लढतीत सर्बियाच्या जोकोविचचा झंजावात रोखत स्पेनच्या कार्लोस अल्कराझने मेलबर्न पार्कवर नव्या अध्यायाची नोंद केली आणि ऑस्ट्रेलियन ओपनच्या पहिल्यावहिल्या जेतेपदाला गवसणी घातली. कार्लोसचे हे कारकिर्दीतील सातवे ग्रँडस्लॅम विजेतेपद. अंतिम सामना ४ सेटपर्यंत चालला. पहिला सेट गमावल्यानंतरही नंतरचे ३ सेट जिंकत कार्लोसने जेतेपदावर आपले नाव कोरले. अल्कराझने अंतिम लढत २-६, ६-२, ६-३, ७-५ अशी जिंकली. या पराभवामुळे जोकोविचचे कारकिर्दीतील २५ वे ग्रँडस्लॅम जेतेपदाचे स्वप्न अधुरे राहिले. अंतिम सामना जिंकत कार्लोसने विश्वविक्रमाला गवसणी घातली. कार्लोसने कारकिर्दीतील चारही ग्रँडस्लॅम जिंकत इतिहासातील सर्वांत तरुण 'करिअर स्लॅम' विजेता होण्याचा मान मिळवला. कार्लोसने वयाच्या २२ व्या वर्षी करिअर स्लॅम पूर्ण केले आहे. या आधी रॉड लेव्हर (२४ वर्षे ३२ दिवस), राफेल नदाल (२४ वर्षे १०२ दिवस), रॉजर फेडरर (२७ वर्षे ३०३ दिवस), नोव्हाक जोकोविच (२९ वर्षे १५ दिवस) आणि आंद्रे आगासी (२९ वर्षे ६८ दिवस) यांनी असा मान मिळवला आहे. कार्लोस अल्कराझने २२ व्या वर्षी (२२ वर्षे २७२ दिवस) हा मान मिळवला आहे. अंतिम लढतीत कार्लोस आणि नोव्हाकच्या फिटनेस आणि स्टॅमिनाचा कस लागला. दोघांनाही उपान्त्य लढतीत घाम गाळावा लागल्याने अंतिम लढतीत दोघांच्याही हालचालींवर आणि कोर्टवरील चपळाईवर थोड्याशा मर्यादा आल्याचे जाणवले. अल्कराझने दुसरा सेट ६-२ असा जिंकला; पण त्याला तिस-या आणि चौथ्या सेटमध्ये जोकोविचचा कडवा प्रतिकार सहन करावा लागला मात्र युवा अल्कराझने जोकोविचचे आक्रमक फटके अफलातून चपळाईने परतवून लावले त्यामुळे अनुभवी नोव्हाकला सतत प्रचंड दबावाखाली राहावे लागले. दोघांनीही खिलाडूवृत्तीचे शानदार प्रदर्शन केले. कार्लोसच्या विजयानंतर त्याचे अभिनंदन करताना नोव्हाक म्हणाला, तुझ्या कामगिरीचे वर्णन करण्यासाठी 'ऐतिहासिक, अभूतपूर्व' असेच शब्द वापरावे लागतील. भविष्यातील वाटचालीसाठी तुला शुभेच्छा! अल्कराझ प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाला, मला सर्वप्रथम नोव्हाकबाबत बोलायला आवडेल... तू केवळ टेनिसपटूच नाही तर सर्वच खेळाडूंसाठी आदर्श आहेस. मीसुद्धा याला अपवाद नाही. तुझ्याविरुद्ध खेळताना मजा आली! म्हणजे खेळात हार-जीत ही चालतच असते; पण खिलाडूवृत्ती ही सर्वांत महत्त्वाची!

# प्रकल्पग्रस्तांची पायपीट थांबणार; 'भूसंपादनाचे नवे पर्व' पोर्टलमुळे पारदर्शकता येणार!

### प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष संजय धनाडे यांनी व्यक्त केला आनंद.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



राज्यातील विविध विकास प्रकल्पांसाठी संपादित केल्या जाणाऱ्या जमिनी, घरे आणि मालमत्तांच्या मोबदल्यासाठी प्रकल्पग्रस्तांना आता सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज उरणार नाही. राज्य शासनाने सुरू केलेल्या 'भूसंपादनाचे नवे पर्व' या संकेतस्थळामुळे प्रकल्पग्रस्तांना दिलासा मिळाला असून, या निर्णयाचे प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष संजय धनाडे यांनी स्वागत केले आहे. एका क्लिकवर सर्व माहिती उपलब्ध अनेक वर्षांपासून प्रकल्पग्रस्त आपल्या हक्काच्या मोबदल्यासाठी, निवाडा पत्रासाठी आणि शासकीय सवलतींच्या प्रमाणपत्रासाठी संघर्ष करत आहेत. या प्रक्रियेत होणारा विलंब आणि माहितीचा अभाव यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला होता. मात्र, शासनाच्या या नवीन पोर्टलमुळे: भूसंपादनाची सद्यस्थिती.

निवाडा जाहीर झाल्याची माहिती. मिळणारा मोबदला आणि प्रमाणपत्रांची उपलब्धता. शासकीय सवलतींचे तपशील. या सर्व बाबी आता एका क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. यामुळे प्रशासकीय कामात गतिमानता आणि पारदर्शकता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. प्रकल्पग्रस्तांना मोबदला प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रांसाठी सतत विविध कार्यालयांत पायपीट करावी लागत होती. ही पायपीट थांबवण्यासाठी शासनाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरेल. डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल आणि सामान्य शेतकऱ्याला त्याचे हक्क वेळेत मिळतील.
> संजय धनाडे, अध्यक्ष, प्रकल्पग्रस्त संघटना

### प्रशासकीय पारदर्शकतेचा नवा टप्पा

**■ भूसंपादनाच्या प्रक्रियेत अनेकदा माहिती लपवून ठेवली जाते किंवा प्रकल्पग्रस्तांपर्यंत वेळेत पोहोचत नाही. 'भूसंपादनाचे नवे पर्व' या वेबसाईटमुळे जमिनीचे संपादन नेमके कोणत्या टप्प्यावर आहे, याची अधिकृत माहिती थेट लाभार्थ्याला मिळणार आहे. ही प्रणाली प्रकल्पग्रस्तांच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने 'नवे पर्व' ठरेल, अशी भावना व्यक्त होत आहे.**

# अजितदादांच्या अस्थिकलश दर्शनासाठी गर्दी

**▸विदर्भ केसरी। अमरावती,**



दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे दर्शन घेण्यासाठी सोमवार २ फेब्रुवारी रोजी आमदार सुलभा संजय खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे अमरावती जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेतेमंडळी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विविध समाज संघटना तसेच शेकडो चाहत्यांनी मोठी गर्दी केली.

यावेळी अस्थिकलशाचे विधिवत पूजन, दादांच्या पवित्र स्मृतींचे स्मरण करत, भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

अजितदादांच्या अंत्यसंस्कारानंतर मुंबई स्थित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयातून त्यांचे अस्थिकलश संपूर्ण राज्यात रवाना करण्यात आले. अमरावती विभागातील पाच जिल्हे व एक वर्धा जिल्हा अशा सहा ठिकाणी अस्थिकलश पोहोचविण्याची जबाबदारी पक्षाचे महासचिव (संघटन) आ. संजय खोडके यांच्यावर सोपविण्यात आली. त्याअनुषंगाने आज अमरावतीत सर्व अस्थिकलशाचे विधिवत पूजन करून अजितदादा यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तदनंतर प्रत्येक जिल्ह्याचा अस्थिकलश हा त्या -त्या जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांकडे देण्यात आला.

जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस परिवार, सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते तसेच सर्व नागरिकांनी दादांच्या अस्थिकलशाचे दर्शन करून, पुष्प अर्पण करत आदरांजली वाहिली. यावेळी अनेकांचे डोळे सुद्धा पाणावले होते. यावेळी सर्व शोकमग्न मंडळींनी खोडके कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. मंगळवारी पहाटे गुरुकुंज मोझरी येथील पवित्र कुंडात श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या परंपरेनुसार अजितदादा यांच्या पवित्र अस्थिकलशाचे विधिवत विसर्जन करण्यात येणार असल्याचे आ. संजय खोडके यांनी सांगितले.

# ६ महिने उलटले, कालवा अजूनही फुटकाच!

## खळबंदा कालव्याच्या दुरुस्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष

**▸विदर्भ केसरी। गोंदिया,**



मागील वर्षीच्या खरीप हंगामात अवकाळी व मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. त्या जखमा भरायच्या आधीच पाटबंधारे विभागाच्या नाकर्तेपणाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम सुरू असल्याचे चित्र गोंदिया जिल्ह्यात दिसून येत आहे.

२६ सप्टेंबर २०२५ रोजी मुसळधार पावसात फुटलेला खळबंदा जलाशयाचा मुख्य कालवा तब्बल सहा महिने उलटूनही दुरुस्त न झाल्याने ५० ते ६० गावांतील शेतकरी सिंचनापासून वंचित राहिले आहेत. सेजगाव, परसवाडा, अर्जुनी, सोनेगाव, नहरटोला, बोरा, बघोलीसह परिसरातील गावांना खरीप व रब्बी हंगामात जीवनदायी पाणी पुरवणारा हा कालवा फुटल्यानंतर शेतकऱ्यांचे धानपीक वाहून गेले. मात्र त्यानंतरही पाटबंधारे विभागाला ना शरम, ना संवेदना असल्याचेच चित्र आहे. परिणामी यंदाचा रब्बी हंगाम शेतकऱ्यांच्या हातातून गेला असून, आता येणारा खरीप हंगामही धोक्यात आला आहे.

या कालव्याच्या दुरुस्तीसाठी बाधित शेतकऱ्यांनी अनेकदा खळबंदा जलाशय कार्यालयाचे उंबरठे झिजवले. मात्र संबंधित विभागातील एकाही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याच्या मनात शेतकऱ्यांच्या वेदनांचा 'पाझर' फुटलेला नाही. शेतकऱ्यांकडून वेळेवर पाणीपट्टी वसूल करणारा विभाग, मात्र संकटात असताना पाठ फिरवतोय, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. कालवा त्वरित दुरुस्त करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सेजगावचे उपसरपंच टेकचंद बिसेन, सोनेगावचे माजी सरपंच बाळु भगत, जितेंद्र बिसेन, महेंद्र पारधी यांच्यासह बाधित शेतकऱ्यांनी दिला आहे.

कालवा फुटण्यास विभागातील अधिकारी व कर्मचारीच जबाबदार असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. पाणीपट्टी व इतर करांसाठी शेतकऱ्यांना वेठीस धरणारा विभाग, मात्र स्वतःच्या जबाबदारीपासून पळ काढत आहे.

### आमदारांच्या आदेशालाही केराची टोपली

**■ खळबंदा कालव्याच्या दुरुस्तीसाठी आमदार विजय रहांगडाले यांनी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देत तातडीने दुरुस्तीचे आदेश दिले होते. मात्र त्या आदेशालाही पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांनी ठेंगा दाखवला, हे सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या दुर्लक्षातून स्पष्ट झाले आहे.**

### विभागातील अधिकारी बेजबाबदार

**■ खळबंदा जलाशयाची देखभाल व दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी पाटबंधारे विभाग, गोंदिया यांच्यावर आहे. मात्र कालवा दुरुस्त करून शेतकऱ्यांना पाणी कसे मिळेल, यासाठी कोणतीही ठोस योजना आखण्यात आलेली नाही. परिणामी रब्बी हंगाम गेला आणि खरीप हंगामही संकटाच्या उंबरठ्यावर आहे.**

### हजारो हेक्टर शेती सिंचनाविना

**■ Repair the canal कालवा फुटल्याचा फटका कारुटोला, अत्री, गोमाटोला, सेजगाव, बोदा, गोंडमोहाडी, सोनेगाव, बेरडीपार, डब्बेटोला, परसवाडा, बोरा, बघोली, किडंगीपार, अर्जुनीसह ५० ते ६० गावांना बसणार आहे. हजारो हेक्टर शेती सिंचनापासून वंचित राहण्याची भीती असून, याला संपूर्णतः प्रशासनाची बेफिकिरी जबाबदार आहे.**

# पुरूषांमध्ये महाराष्ट्र तर महिलांमध्ये हरियाणा अजिंक्य

## आमदार चषक राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा : तिवसा येथे ऐतिहासिक आयोजन

**▸विदर्भ केसरी। तिवसा,**



भारतरत्न माजी पंतप्रधान श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त क्रीडाक्षेत्राच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीचा संदेश देण्याच्या उद्देशाने तिवसा विधानसभेचे आमदार राजेश वानखडे यांच्या पुढाकाराने आयोजित आमदार चषक २०२६ अखिल भारतीय खुली पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा तिवसा येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली.

आधार फाऊंडेशन, अमरावती व आमदार राजेश वानखडे मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या स्पर्धेने संपूर्ण विदर्भात क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेतले. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेतील अंतिम सामने अत्यंत चुरशीचे व रोमहर्षक ठरले. पुरुष गटाच्या अंतिम फेरीत युवा पलटण पुणे संघाने दमदार खेळ सादर करत अजिंक्यपद पटकावले, तर महिला गटात काशा हरियाणा संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. विजेत्या संघांना अनुक्रमे २ लाख व १.५ लाख रुपयांचे रोख बक्षीस प्रदान करण्यात आले.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार प्रताप अडसड, आमदार सुमित वानखेडे व आमदार राजेश वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना रोख बक्षीस व आकर्षक ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. पुरुष गटात समर्थ अमरावती संघाने द्वितीय, तर पंचरत्न हिमाचल संघाने तृतीय क्रमांक पटकावला. महिला गटात मुकलान हिस्सार संघ उपविजेता, तर एम.डी. युनिव्हर्सिटी रोहतक संघ तृतीय क्रमांकावर राहिला. सर्व विजेत्या व उपविजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेदरम्यान एकूण ६ लाख ८० हजार रुपयांचे रोख बक्षीस वितरण करण्यात आले.

या स्पर्धेच्या अंतिम दिवशी भारतीय कबड्डी संघाचा कर्णधार व अर्जुन पुरस्कार विजेता पवन सेहरावत यांची उपस्थिती हे विशेष आकर्षण ठरले. स्पर्धेत राज्यासह परराज्यातील २९ पुरुष व २० महिला संघांनी सहभाग नोंदविला. बक्षीस वितरण सोहळ्याला भाजपा प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, तुषार भारतीय, प्रशांत डहाणे, भाजपा जिल्हा सरचिटणीस नितीन गुडधे, जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने, संजय देशमुख, आयोजन समिती स्वागताध्यक्ष प्रदीप गौरखेडे, आरती वानखडे, विशेष निमंत्रित छाया दंडाळे, तहसीलदार मयूर कळसे, प्रा. डॉ. अनिल कडू, तालुकाध्यक्ष सागर शिंगाणे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन कपिल निर्गुण यांनी केले, तर सचिन राऊत यांनी आभार प्रदर्शन केले.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

# GOOD MORNING कॉटनसिटी



!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## कृषी साहित्यांची चोरी वाढली

यवतमाळ : जिल्ह्यात मोटारपंप व इतर कृषी साहित्य चोरीचे गुन्हे वाढले आहेत. रब्बी हंगामात सिंचनाची गरज असतानाच हजारो रुपये किमतीचे मोटारपंप चोरीला जात आहे. याबाबत तक्रारी झाल्या असूनही पोलिसांकडून हे गुन्हे उघडकीस आणले जात नाही. शेतकऱ्यांची मात्र मोठी अडचण होत आहे. आता तर गोठ्यातील जनावरेसुद्धा असुरक्षित झाली आहेत. त्यांच्यावरही चोरट्यांचा डोळा आहे. यामुळे ग्रामीण भागातही चोरांची दहशत निर्माण झाली आहे. शेतातील कृषी उपयोगी साहित्यासह गोठ्यात बांधलेल्या जनावरांबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महत्त्वाचे

### डब्यात ठेवलेले दहा हजार रुपये उडवले

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

: गरजेला वापरता येतील म्हणून घरातील डब्यात सुरक्षित ठेवलेले दहा हजार रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केले. ही घटना राळेगाव तालुक्यातील आष्टोना गावात २९ जानेवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणी मधुकर विठ्ठल आत्राम (४८) रा. आष्टोना ता. राळेगाव यांनी वडकी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनेच्या दिवशी चोरट्याने त्यांच्या घराचा कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील स्टीलच्या डब्यात ठेवलेले नगदी १० हजार रुपये चोरुन नेले, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. प्राप्त फिर्यादीवरुन वडकी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### रॅलीत कार्यकर्त्याचा अपघात

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

नगरपालिकेची निवडणूक रॅली सुरु असताना एक कार्यकर्त्याला भारधाव कारने धडक दिली. यात त्या कार्यकर्त्याचा पाय जायबंदी झाला आहे. २१ डिसेंबर २०२५ रोजी घडलेल्या अपघाताची तक्रार १ फेब्रुवारी २०२६ रोजी शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली. जमील बाबूलाल शेख (५७) रा. वंजारी फैल यवतमाळ असे या अपघातात जखमी झालेल्या कार्यकर्त्याचे नाव आहे. ते निवडणूक रॅलीमध्ये पायदळ जात असताना बलभीम आखाडा परिसरात त्यांना एमएच ३४ एए १२७७ क्रमांकाच्या भरधाव कारने धडक दिली. या धडकेने ते खाली पडले असता कारचे चाक त्यांच्या पायावरुन गेले. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर कारचालक कार सोडून पळून गेला. या प्रकरणात शहर पोलिसांनी संबंधित कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### ओबीसीची जात निहाय जनगणना करण्याच्या उद्देशाने जनजागृती मोहीम

**▸विदर्भ केसरी।**

ओबीसी जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी ओबीसी जन मोर्चा,



भारतीय पीछडा शोषित संघटन, ओबीसी क्रांती दल संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच झाली. केंद्र सरकारने जनगणनेच्या संदर्भामध्ये जे नोटिफिकेशन काढले त्याच्यामध्ये अनुसूचित जाती ,अनुसूचित जमातीचा उल्लेख आहे, परंतु ओबीसी प्रवर्गाचा उल्लेख केला गेलेला नाही आहे. हा ओबीसी सोबत केंद्र सरकारने केलेला धोका आहे .या धोक्याच्या संदर्भामध्ये ओबीसी समाजातील बांधवांनी जागृत होऊन ,आपले हक्क आणि अधिकार मिळवून घेण्यासाठी .आणि ओबीसी सहित सर्वच जातींची जात निहाय जनगणना झाली पाहिजे याकरता देशव्यापी आंदोलन उभे करणे, महाराष्ट्रातील सर्व खासदारांना निवेदन देणे ,ही भूमिका व्यक्त करण्यात आली .याप्रसंगी डॉक्टर गोरे ,डॉक्टर विलास काळे ,गोविंद चव्हाण ,दीपक वाघ, मायाताई गोरे ,सुनीता काळे, अनिलराव जीपकाटे ,विजय डोंगरे ,कमलताई खंडारे ,उषा सोनटक्के, मनोज पाचघरे, विजय निवल ,अशोक मोहुरले, गोविंद चव्हाण ,दिलीप बोरगमवार,ज्योती निरपासे, आदी ओबीसी बांधव उपस्थित होते .

# साहेब, आमच्या कुंकवाचं रक्षण करा हो..!



**▸विदर्भ केसरी। राळेगाव,**

राळेगाव पोलिस ठाण्यांतर्गत सावनेर येथे बस स्टॉप परिसर व वाढोणा रोडलगत दिवसरात्र राजरोसपणे अवैध दारू विक्री सुरू आहे. याचा महिलांना त्रास होत आहे.

तसेच गावातील सामाजिक शांतता धोक्यात आली आहे. त्यामुळे गावातील दारूविक्री कायमस्वरूपी बंद करण्यासाठी सावनेर येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष व गावकऱ्यांनी गुरुवार, २९ जानेवारी रोजी दुपारी राळेगाव पोलिस धडक देऊन उपनिरीक्षक विशाल बोरकर यांना निवेदन दिले. तसेच दारूमुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाल्यामुळे, 'आमच्या कुंकवाचं रक्षण करा हो..' असा एकच टाहो महिलांनी यावेळी फोडला.

सावनेर येथे बस थांबा परिसर व वाढोणा रस्त्यालगतच्या शेतांत अनेक दिवसांपासून अवैध देशी दारू खुलेआम विकली जात आहे. अनेक कुटुंबातील कर्ता पुरुष व्यसनाधीन होत महिलांना व लहान मुलांना नाहक त्रास होत आहे. तसेच विद्यार्थी व तरुणाई देखील दारूच्या व्यसनाला बळी पडत आहे. यातून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळे 'साहेब, आता तरी अवैध दारू बंद करा आणि आमच्या मुलांसोबतच कुंकवाच्या धन्याला वाचवा..' असा आक्रोश करत संतप्त महिलांनी राळेगाव पोलिस ठाण्यावर धडक दिली व दारूविक्री बंद करण्याची मागणी केली.

या दारू विक्रीबाबत मोठ्या प्रमाणात महिलांच्या तक्रारी आहेत. तसेच गावातील सरपंचांनीसुद्धा दारू विक्रेत्यास भेटून दारू विक्री बंद करा, असे सांगूनसुद्धा दारू विक्री बंद केलेली नाही. पोलिसांना तक्रार दिली मात्र दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे या विक्रेत्यांचा बंदोबस्त करण्याची गरज निर्माण झाली आहे. ही दारूविक्री बंद झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा यावेळी महिलांनी दिला. यावेळी निवेदन देताना सरपंच प्रणिता खोब्रागडे, माया उईके, सविता नेहारे, निकिता गुरनुले, वनिता मडावी, वैशाली उईके, गुंफा उईके, मंगला वाघाडे, वंदना वाघाडे, सुरेखा वाघाडे, रंजना खेकारे, सत्यकला मेश्राम, कुंदा कुमरे, बबिता गुरनुले, पूनम आत्राम, लक्ष्मी घोटेकर, मीरा आत्राम, वच्छला खंगारे, रंजना कुमरे गावातील असंख्य महिला उपस्थित होत्या.

### अवैध दारूविक्री सर्रास

■ तालुक्यातील सावनेरसह परिसरातील अनेक गावांत अवैध दारूविक्री सर्रासपणे सुरू आहे. दारूविक्रेते भरधाव वेगाने रात्रीच्या वेळी चारचाकी वाहनाने दारूच्या पेट्या टाकून मोकळे होतात. गावातील अवैध दारू विक्रेत्यांना जागेवर दारूची पेटी आणून देण्याचे काम राळेगाव, कळंब येथील दारू विक्रेते करतात. नाकावर टिच्चून ग्रामीण भागात दारूचा अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मात्र, दारू विक्रेत्यांवर कुठलीच कारवाई होत नाही. उलट या धंद्यात वाढच होत आहे.

## पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्ती योजना

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ, दि.2 (जिमाका) :**

प्रकल्प कार्यालय पांढरकवडा यांच्या मार्फत पारधी विकास योजनेअंतर्गत पारधी समाजातील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना तसेच शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येईल. पांढरकवडा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या यवतमाळ, राळेगाव, कळंब, बाभुळगाव, मारेगाव, वणी, केळापूर, झरी जामणी व घाटंजी या तालुक्यांतील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय व अनुदानित शाळा तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशित पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी लागू राहील. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांचे दरमहा किमान 80 टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा 700 रुपये तर इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा 1 हजार रुपये प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्ती या प्रमाणे राहील.

विद्यार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते आहे किंवा पालकांसोबत संयुक्त खाते आहे, अशाच विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांचे नाव बँक पासबुकवर असणे आवश्यक असून बँक पासबुक व आधार कार्डच्या झेरॉक्स प्रती जोडणे अनिवार्य आहे. मुख्याध्यापकांकडून प्रमाणित यादीनुसार विद्यार्थ्यांच्या खात्यात निधी जमा केला जाईल. असे सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा यांनी कळविले आहे.

## लोकनेते अजितदादा पवार यांच्या अस्थी कलश दर्शनाचे यवतमाळात आयोजन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ:**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आधारस्तंभ आणि जनसामान्यांचे लाडके नेते मा. अजितदादा पवार यांच्या अस्थींचा कलश आज अमरावतीवरून यवतमाळ शहरात आगमन करीत आहे. दादांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या अंतिम दर्शनासाठी यवतमाळ जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सार्वजनिक दर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर पाटील यांनी दिली आहे.

आगमन व दर्शन: आज, सायंकाळी ठीक ७:०० वाजता, हाऊसिंग फायनान्स कार्यालय, दारव्हा रोड, यवतमाळ येथे अस्थी कलशाचे आगमन होईल. सार्वजनिक दर्शन: दिनांक ३ फेब्रुवारी आणि ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत अस्थी कलश हाऊसिंग फायनान्स कार्यालय येथे सर्व नागरिकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येईल. ज्या लोकनेत्याने रयतेच्या हितासाठी आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले, त्या लाडक्या नेतृत्वाला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि अंतिम दर्शन घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर पाटील यांनी केले आहे.

## 15 लाख मुलींना आत्मरक्षण प्रशिक्षण




**▸विदर्भ केसरी। यवतमाळ -**

इतिहास घडवणाऱ्या या क्रांतिकारी पावलात, महाराष्ट्र शिक्षण परिषद मंडळ ( MPSP ) रानी लक्ष्मीबाई आत्मरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यासह महाराष्ट्र भरातील सुमारे 15 लाख मुलींना प्रशिक्षण देऊन विश्वविक्रम प्रस्थापित करणार आहे. माननीय मंत्री दादासाहेब भुसे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली राबवल्या जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे राज्यभरातील मुलींच्या सशक्तीकरण आणि सुरक्षेत महत्त्वपूर्ण वाटचाल होणार आहे. या उपक्रमाबद्दल बोलताना मंत्री दादासाहेब भुसे म्हणाले, "आमच्या मुलींचे सशक्तीकरण आणि सुरक्षा हे आमचे प्राधान्य आहे. या उपक्रमातून महाराष्ट्र देशासमोर एक नवा आदर्श ठेवणार आहे."

हा कार्यक्रम राज्यात राबवलेला आत्मरक्षण प्रशिक्षणाचा सर्वात मोठा उपक्रम असून, युवतींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करतो.

## इंदिरा महाविद्यालयाच्या रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन संपन्न

**▸विदर्भ केसरी। कळंब(ता. प्रतिनिधी):-विरेंद्र चव्हाण**




कळंब :डॉ. य. मो. दोंदे सार्वजनिक शैक्षणिक ट्रस्ट, कळंब द्वारा संचालित इंदिरा महाविद्यालय, कळंब येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सत्र २०२५–२६ करिता आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन ३१ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. हे शिबिर दि. ३० जानेवारी २०२६ ते ०६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दत्तक ग्राम थाळेगाव (पुनर्वसन), ता. कळंब, जि. यवतमाळ येथे आयोजित करण्यात आले आहे. 'जलसंधारण व ओसाड जमीन विकासाच्या माध्यमातून शाश्वत विकासासाठी युवकांचा सहभाग' या संकल्पनेवर आधारित या शिबिरात ग्रामस्वच्छता, जलसंधारण, वृक्षलागवड, पर्यावरण जनजागृती, महिला सक्षमीकरण, व्यक्तिमत्त्व विकास, अंधश्रद्धा निर्मूलन व शेतकरी जनजागृती यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. श्रमदान, बौद्धिक सत्रे, आरोग्य तपासणी शिबिर, जलसंवर्धन कार्यशाळा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर तर उद्घाटक म्हणून थाळेगाव (पुनर्वसन)चे उपसरपंच दिनेश वानखडे व प्रमुख अतिथी म्हणून कळंबचे सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार श्री. अशोक उमरकर हे उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी वक्त्यांनी शिबिरासाठी शुभेच्छा देतानाच विद्यार्थ्यांनी ग्रामीण विकासासाठी योगदान देत सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी शिबिरात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ वक्ते मार्गदर्शन करणार असून विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सामाजिक जबाबदारी व नेतृत्वगुण विकसित होण्यास हे शिबिर उपयुक्त ठरेल असा आशावाद व्यक्त केला. या शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. कैलाश नेमाडे व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्राची बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. उद्घाटन सोहळ्याकरिता व्यासपीठावर संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. वीरा मांडवकर, जेष्ठ प्राध्यापक नीलकंठ नरुले, माजी कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रशांत जवादे व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आशीर्वाद स्वीट मार्ट सील करण्याचे आश्वासन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ:**



यवतमाळ,दि.२ फेब्रुवारी — यवतमाळ शहरातील स्टेट बँक चौक परिसरात असलेल्या आशीर्वाद स्वीट मार्ट येथून विक्री करण्यात आलेल्या ढोकळ्यामध्ये जिवंत अळ्या आढळून आल्याच्या गंभीर घटनेने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या या प्रकाराविरोधात ठोस व कठोर कारवाईची मागणी होत असून,आज दिनांक २ फेब्रुवारी (सोमवार) रोजी संबंधित प्रकरणाबाबत पुन्हा एकदा अन्न व औषध प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला.

या प्रकरणी सोशल मीडिया काँग्रेस कमिटी यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके,कॉम्रेड सचिन मनवर,महिला पोलीस हवालदार मंजुळा किशोर भगत व शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते प्रा.पंढरी पाठे यांनी सहायक आयुक्त (अन्न) / अन्न सुरक्षा अधिकारी महाजन साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेतली.यावेळी यवतमाळ शहरासह संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यातील हॉटेल्स,रेस्टॉरंट्स,स्वीट मार्ट,तसेच अन्न व दुग्धजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या आस्थापनांची अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार सखोल तपासणी व चौकशी करण्यात यावी,अशी ठाम मागणी उपस्थितांनी केली.

दिनांक २६ जानेवारी रोजी आशीर्वाद स्वीट मार्ट येथून खरेदी करण्यात आलेल्या ढोकळ्यामध्ये अळ्या आढळून आल्या होत्या.हे ढोकळे ड्युटी संपल्यानंतर महिला पोलीस हवालदार मंजुळा किशोर भगत यांनी घरी नेले होते.लहान बहिणीच्या वाढदिवसानिमित्त मुलांनी ढोकळ्याचे सेवन केले असताना,वाढदिवसाच्या मुलीच्या लक्षात प्रत्यक्ष अळी आल्याने हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.या घटनेमुळे लहान मुलांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असून,कुटुंबीयांसह नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या संदर्भात अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडे यापूर्वीच अधिकृत निवेदन सादर करण्यात आले असून,संबंधित दुकानाची तात्काळ तपासणी,अन्ननमुने जप्त करून प्रयोगशाळा तपासणी,दोषी आढळल्यास दुकान सील करणे अथवा परवाना रद्द करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आजच्या भेटीत अन्न सुरक्षा अधिकारी महाजन साहेब यांनी आशीर्वाद स्वीट मार्ट,स्टेट बँक चौक,यवतमाळ हे दुकान लवकरात लवकर सील करण्यात येईल,असे ठोस आश्वासन दिले. तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी जिल्हाभर विशेष तपास मोहीम राबविण्यात येईल,असेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी अन्न सुरक्षा विभागाचे कार्यालयीन कर्मचारीही उपस्थित होते. या घटनेमुळे यवतमाळ शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला असून,आता अन्न व औषध प्रशासन कोणती कठोर व उदाहरणार्थ कारवाई करते,याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले

## जिल्ह्यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती व कुष्ठरोग निवारण अभियान

### सुरक्षित महाराष्ट्र अभियान प्रभावीपणे राबवा-जिल्हाधिकारी विकास मीना

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

कुष्ठरोग निवारण दिनानिमीत्त जिल्ह्यात आजपासून ते १२ फेबुवारीपर्यंत " स्पर्श" कुष्ठरोग जनजागृती अभियान व कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) मोहीम राबविण्यात येणार आहे.

या कालावधीत विविध कुष्ठरोग जनजागृती कार्यक्रम विविध उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे कुष्ठरोगाबाबत समाजात असलेला भेदभाव गैरसमज समाप्त करण्यासाठी आणि कुष्ठरोगाने नविन रुग्ण शोधणे व त्यांना वेळेत पुर्ण औषधोपचार मिळण्याकरीता सदर अभियानातुन वंचित घटकांची कुष्ठरोगाबाबत तपासणी व कुष्ठरोगाची जनजागृती प्रभाविपणे करण्यात यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी आरोग्य विभागाला दिले.

सदर अभियानाबाबत दि. २९ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात " स्पर्श" कुष्ठरोग जनजागृती अभियान व कुष्ठरोग सुरक्षित नहाराष्ट्र (कुसुम) मोहिमेबाबत जिल्हा समन्वय समितीची सभा जिल्हाधिकारी विकास मीना यांचे अध्यक्षतेत घेण्यात आली सदर सभेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. मंदार पत्की, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष केले, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. सुखदेव राठोड, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. गोपाळ पाटील, शिक्षण अधिकारी (प्राथ.) यांचे सह जिल्हास्तरीय सर्व अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक उपस्थित होते. अभियानातंर्गत २६ जानेवारी आयोजीत रोजी सर्व ग्रामपंचायत मध्ये आयोजीत ग्रामसभेत व सर्व शासकिय कार्यालयात ध्वजारोहणानंतर कुष्ठरोगाबाबत जिल्हाधिकारी यांचे जनतेस केलेले आवाहन, कुष्ठरोगाबाबत प्रतिज्ञा संरपंच यांचे भाषण, कुष्ठरोग आजाराबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली आहे. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधी कुष्ठरोग पंधरवाडा म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या पंधरवड्यात कुष्ठरोगाबाबत विविध उपक्रमाअंतर्गत कुष्ठरोग जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये सर्व शाळा व महाविद्यालय येथे प्रार्थनेच्या वेळी कुष्ठरोग प्रतिज्ञेचे वाचन,शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी कुष्ठरोगाबाबत प्रश्नमंजुषा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, कुष्ठरोगाबाबत नुक्कड नाटक याव्दारे तसेच नागरीकमध्ये जनजागृती करीत महीला बचत गट, महीला मंडळ, भजनी मंडळ, विविध धार्मिक स्थळावरून कुष्ठरोगाबाबत माहीती देणे. बाजारामध्ये कुष्ठरोग प्रदर्शनी लावणे, कुष्ठरोगाबाबत संदेश देणारे पोस्टर, बैनर लावणे, तसेच खाजगी वैद्यकिय व्यावसायीक यांच्या कार्यशाळा घेणे याद्वारे कुष्ठरोग आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) या मोहिमेव्दारे जिल्हयात वरील कालावधीत नियमित विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित राहणा-या दुर्लक्षित राहणा-या गटावर उमा विटभटटी कामगार, खाण कामगार, स्थलांतरीत व्यक्ती, बांधकाम मजुर,



निवासी आश्रम शाळेत राहणारे विद्यार्थी, कंपनीत कारखान्यात काम करणारे कामगार इ.वर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. या गटातील लोक हे कामाकरीता मजुरीकरीता लवकर घर सोडतात व उशिरा घरी परत येतात यामुळे अशा व्यक्तींची आरोग्य तपासणी नियमित सर्वेक्षण अथवा कुष्ठरोग शोध मोहीमे मध्येही होत नाही. याकरीता वेगवेगळया उपेक्षित गटांची माहीती घेऊन आशा स्वयंसेविका व पुरुष स्वयंसेवक आरोग्य कर्मचारी यांच्या मदतीने प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना उपचार देण्यात येणार आहे. जिल्ह्यात २०२७ पर्यंत कुष्ठरोग मुक्त करण्याकरीता समाजामध्ये कुष्ठरोग आजाराविषयी जनजागृती करून कुष्ठरोग हा इतर आजाराप्रमाणेच जंतु पासुन होणारा आजार असून बहुविध औषधोपचाराने हा आजार १०० टक्के बरा होतो कुष्ठरोगाचे निदान व औषधोपचार हा सर्व पासकीय दवाखाण्यात मोफत केले जातात. हा आजार देवी कोपामुळे किंवा पापामुळे होत नाही. हा आजार अनुवंशीक नाही. त्यामुळे या आजारबाबत असलेले गैरसमज दुर केले पाहीजेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व नागरिकांना करण्यात आले आहे.

## व्यावसायिकाची २३ लाखांनी फसवणूक

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

व्यवसायाशी संबंधित महागड्या मशिन्स नावावर करुन देतो, अशी बतावणी करत शहरातील एका व्यावसायिकाची तब्बल २२ लाख ९५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. हे प्रकरण पोलिसात दाखल होताच छत्तीसगडमधील एका आरोपीविरुद्ध १ फेब्रुवारी रोजी तातडीने गुन्हा दाखल करण्यात आला.

अंकुश विजय कोटेचा (३३) रा. प्रगती सोसायटी यवतमाळ, असे फसवणूक झालेल्या येथील व्यावसायिकाचे नाव आहे. तर जसपालसिंग (५५) रा. आमडीगनर भिलाई जि. दुर्ग छत्तीसगड असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या दोघांमध्येही २०२४ च्या मे महिन्यात व्यवहाराशी संबंधित बोलणी झाली होती. त्यात जसपालसिंग याने खोटे दस्तावेज बनवून महागड्या मशनरी अंकुश कोटेचा यांच्या नावावर करुन देतो, अशी बातावणी केली. त्यात ८ लाख २५ हजार रुपये किमतीची जेसीबी मशिन आणि १४ लाख ७० हजार रुपये किमतीच्या सेल्फ लोडिंग मिक्सन मशिनचा समावेश होता. या व्यवहारापोटी जसपालसिंग याने कोटेचा यांच्याकडून २२ लाख ९५ हजार रुपये घेतले. मात्र २०२४ पासून आता २०२६ उजाडले तरी कोटेचा यांना मशिन दिल्या नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अंकुश कोटेचा यांनी येथील अवधूतवाडी पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यावरुन १ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महत्त्वाचे



## संत शिरोमणी गुरु रविदास महाराज जयंती उत्साहात, नगराध्यक्षांचा सत्कार

**विदर्भ केसरी। मुर्तिजापूर प्रतिनिधी.**

आशीर्वाद मंगलमय ग्रामसेवक कॉलनी दर्यापूर रोड या ठिकाणी मोठ्या उत्साहाच्या व आनंदाच्या वातावरणात समाजाच्या वतीने संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती उत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता समस्त चर्मकार समाज बांधवांच्या वतीने संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले त्याचबरोबर मूर्तिजापूर येथील नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल साबळे सह सर्व नगरसेवकांचा सत्कार सोहळा या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज बांधवांनी रविदास महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला त्याचबरोबर समाजाच्या समस्या विषयी या ठिकाणी समस्त चर्मकार समाज बांधवांनी विशेष बैठक घेऊन चर्चा केली कार्यक्रमाला कोमल तायडे, सरपंच पंकज सावळे, राजकुमार नाचणे, श्याम खंडारे व इतर चर्मकार समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या जयंती सोहळ्याची सांगता....

**विदर्भ केसरी। मंगरूळपीर: -**

शहरातील स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक चौक येथे संत रविदास महीला मंडळ यांच्या वतीने संत रविदास महाराज यांची जयंती कार्यक्रम मोठ्या उल्हासाने पार पडला. प्रारंभी गुरु रविदास यांच्या प्रतिमेचे पुजन सौ. लता चितलांगे (महिला व बालकल्याण सभापती तथा नगर सेवीका) यांच्या हस्ते झाले. नंतर डॉ. बाबासाहेब यांच्या स्मारकास हार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते बुंदी प्रसाद वाटप करण्यात आला. सुरु रविदासांच्या आदर्श विचारसरणीवर सौ. चंचल खिराडे यांनी प्रकाश टाकला. तदनंतर जॅ. बालाजी उचितकर तसेच बंडू भगत यांची समायोजित भाषणे झाली निर्वासित पालावरील मुलांना व महीलांना सुद्धा खाऊ व प्रसाद वाटप करण्यात आला. "ऐसा चाहू राज मै जहाँ मिले सबनको अन्न छोटे-बडे सब सम बैठे रविदास रहे प्रसन्न" या उक्ती प्रमाणे चालण्याचा संत रविदासीय महीला मंडळ यांनी प्रयत्न केला. याप्रसंगी प्रा. अनिल पाटील, गजानन ढोले, सह अन्य नागरिकांचे यावेळी विशेष सहकार्य लाभले.इंगळे, सुनिता खिराडे, तेजश्री इंगळे, चंचला पाटील, किर्ती परालि, लता चापके, सर्व संत रविदासीय महीला मंडल पदाधीकारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचलन सौ. चंचल खिराडे व आभार प्रदर्शन जयश्री इंगळे यांनी केले. डॉ. आधा पदमणे, कल्पना पाटील, रेखा शिंदे, जयश्री यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती

# अन् मृत्यूचे तार झाडात!

## महावितरण राजा लक्ष देणार का? ....तर जिवीतहानी

**विदर्भ केसरी। दर्यापूर**

**दर्यापूर शहरातील नितीन हिरूळकर ज्वेलर्सच्या जवळ व आगार परिसरासमोर महावितरणची 3-फेज वीज लाईन झाडाच्या फांदीत गुंतलेली असल्याचा अत्यंत धोकादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही वीजवाहिनी थेट झाडाच्या फांदीला लागलेली असून, कोणत्याही क्षणी मोठी जीवितहानी होण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे.**



विशेष म्हणजे या झाडावर वन्य प्राणी व वानर नेहमी बसत असल्याने, फांदी तुटल्यास किंवा हालचाल झाल्यास लाईव्ह वायर खाली कोसळून गंभीर अपघात होण्याचा धोका आहे. याच ठिकाणी नागरिकांची, ग्राहकांची व वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा परिस्थितीत महावितरण विभागाने तात्काळ दखल न घेतल्यास अपघात अटळ असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत महावितरण विभागाला कळविले तरी याबाबत कोणतीही तातडीची कारवाई झालेली नाही, ही बाब अधिक चिंताजनक आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवाल संतप्त नागरिक उपस्थित करत आहेत.

**जबाबदारी कोण घेणार?**

- **महावितरण विभागाने तात्काळ पाहणी करून संबंधित वीजवाहिनी सुरक्षित करावी व झाडाची छाटणी करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.**

## रामाची आदर्शवत मूल्य आजच्या समाजाने अंगिकारावे.



भक्ती देशमुख.

### प्रतिभा तिडके स्मृती व्याख्यानमालेत 'अपरिचित रामा'चा परिचय.

**विदर्भ केसरी।मुर्तिजापूर प्रतिनिधी.**

भगवान श्रीराम हे केवळ एक ऐतिहासिक पात्र नसून ते प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत. रामाची सकारात्मकता व त्यांचे जीवन मूल्ये आजच्या संघर्षाच्या काळात समाजाला नवी उमेद देतील, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्यात्या भक्ती देशमुख यांनी केले. येथील श्री गाडगे महाराज विद्यालयाच्या प्रतिभा तिडके स्मृती सभागृहात आयोजित सुवर्ण महोत्सवी व्याख्यानमालेचे अंतिम पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. या व्याख्यानाचा विषय `अपरिचित श्रीराम` असा होता.

भक्ती देशमुख यांनी आपल्या व्याख्यानातून श्रीरामाच्या जीवनातील विविध पैलू उलगडले. श्रीराम हे एक आदर्श विद्यार्थी, नेता, पिता, पती व राष्ट्रप्रेमी कसे होते, याचे दाखले त्यांनी दिले.

रामायणातील काही कमी चर्चिल्या गेलेल्या प्रसंगांना त्यांनी उजाळा दिला. रामाने आयुष्यभर जपलेली मर्यादा, कठीण प्रसंगात दाखवलेली सकारात्मकता आणि सामान्यांशी असलेले त्यांचे नाते यावर त्यांनी विशेष भाष्य केले.

आजच्या धावपळीच्या व तणावाच्या युगात रामाचे विचार कसे मार्गदर्शक ठरू शकतात, हे त्यांनी प्रभावीपणे मांडले. व्याख्यानाच्या सुरुवातीला कर्मयोगी संत गाडगेबाबा व प्रतिभा तिडके यांच्या प्रतिमेचे पूजन व स्मृतीज्योत प्रज्वलन करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य सुवर्णा गावंडे यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपक तिडके यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. राजकन्या खणखणे यांनी केले. याप्रसंगी ज्येष्ठ सहकार नेते ॲड. भैय्यासाहेब तिडके, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष अभिजित तिडके, संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. अभिषेक तिडके, प्राचार्य डॉ. संतोष ठाकरे, रुपाली तिडके, प्रा. दीनानाथ गायकवाड, प्रा. डॉ. चिंतामण कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने रसिक श्रोते उपस्थित होते.

## संस्कार विद्या मंदिर मेडशी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**विदर्भ केसरी। प्रतिनिधी :विठ्ठल भागवत**

मेडशी येथील संस्कार विद्या मंदिर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून श्री पांडुरंग इंगळे सहाय्यक पोलीस निरीक्षक तथा दुय्यम ठाणेदार पोलीस स्टेशन मालेगाव हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा उल्हास मेडशीकर हे होते. तर प्रमुख उपस्थितांमध्ये शाळेचे अध्यक्ष श्री दिगंबरजी घुगे शाळेचे मुख्याध्यापक श्री कुणाल राठोड,प्रा नितीन भोळे, प्रा अनिल मगर,डॉ सतीश बाहेती,डॉ सतीश घुगे,शेख जमीर शेख गणीभाई,वैभव तायडे,सौ प्रियाताई पाठक,सौ लक्ष्मीताई तायडे,सौ. रूपाली घुगे तसेच सर्व पत्रकार बांधवांची उपस्थिती लाभली. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, नाटिका व गीतांच्या माध्यमातून आपली कला सादर केली.उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल पालक, शिक्षकवृंद व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. अशा प्रकारे संस्कार विद्या मंदिर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

## मूकनायक पत्रकार वर्धापन दिन व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा उत्साहात साजरा !

**विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**



**बाळापूर** : बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे नॅशनल व्हॉईस मीडिया फोरमच्या वतीने मूकनायक पत्रकार वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या,व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष उत्तम वानखडे तर स्वागताध्यक्ष म्हणून राष्ट्रीय महासचिव प्रकाश सरदार उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट अभिनेता भरत गणेशपुरे, लॉर्ड बुद्ध टीव्हीचे संचालक सचिन मून, ज्येष्ठ संपादक भूपेंद्र गणवीर, प्रख्यात वकील राजेश झाल्टे, राष्ट्रीय संघटक दिनेश इखारे, राज्य संघटक पदमा मोहड, राज्य सदस्य विनोद सोनवणे, किरण उपाध्ये आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सर्व महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून झाली. त्यानंतर राष्ट्रीय महासचिव प्रकाश सरदार यांनी प्रस्ताविक केले. ज्येष्ठ संपादक भूपेंद्र गणवीर यांनी पत्रकारांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या परिस्थितीत पत्रकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची पत्रकारिता जिवंत ठेवण्यासाठी आपले जीवन व्यतीत करावे. काही सत्ताधारी सरकारांची चाकरी करून पत्रकारितेची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचे ते म्हणाले. असे झाल्यास देशाचे वाटोळे होण्यास वेळ लागणार नाही, असे सांगून त्यांनी पत्रकारांनी प्रामाणिकपणे जबाबदारी पार पाडावी, असे आव्हान दिले. यानंतर चित्रपट अभिनेता भरत गणेशपुरे यांनी आपल्या खास शैलीत भाषण करून उपस्थितांना मनोरंजन केले. संदीप बडगे आणि रजनी भारसके यांनी देशभक्ती व समाज प्रबोधनात्मक गीते सादर केली.

त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार वितरण करण्यात आले. नॅशनल व्हॉईस मीडिया फोरमच्या वतीने विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल खालील व्यक्तींना सन्मानित करण्यात आले: नॅशनल व्हॉईस मीडिया फोरमच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना हे पुरस्कार दिले जातात. कार्यक्रमाचे नियोजन महाराष्ट्र राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांनी केले होते. सूत्रसंचालन तुषार वाघुळदे यांनी केले, तर उपस्थित पत्रकार व मान्यवरांचे आभार राष्ट्रीय महासचिव प्रकाश सरदार यांनी मानले.

# नागरी समस्ये विरोधात शिवसेना आक्रमक

## उपविभागीय अधिकारी अचलपूर, नगर अध्यक्ष अचलपूर, मुख्याधिकारी यांना दिले निवेदन

**विदर्भ केसरी। परतवाडा**




अचलपूर येथील क्षेत्रफळाने आणि लोकसंख्येने विस्तृत असलेल्या बुंदेलपुरा नागरी वस्ती मधील खराब रस्ते, बंद पडलेले पथदिवे, नादुरुस्त हॅन्ड पंप यासह अनेक नागरी समस्या घेऊन अचलपूर शिवसेना शहर प्रमुख आतिश अहिर यांच्या नेतृत्वात अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, अचलपूर नगराध्यक्ष सौ.रूपालीताई अभय माथने, मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड यांना स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत लेखी निवेदन देण्यात आले.

बुंदेलपुरा स्थित असलेल्या लक्ष्मीनारायण मंदिर गवळीपुरा राम मंदिर पर्यंतचे रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे आणि लक्ष्मीनारायण मंदिर व भुजेरिया चौक गवळीपुरा आणि शीतला माता मंदिर ठाकूरपुरा या ठिकाणी हाय मॅक्स लाईट बसवून द्यावे तसेच लक्ष्मीनारायण मंदिर येथील बंद पडलेले हॅन्ड पंप मध्ये नव्याने कनेक्शन टाकून नागरिकांसाठी पाणीपुरवठा पूर्वीप्रमाणे सुरू करावा यासोबतच बुंदेलपुरा भागातील किमान दहा ते बारा वर्षापासून रस्त्याची अत्यंत खराब स्थिती असून या ठिकाणी रस्त्यामुळे दररोज किरकोळ अपघात होत आहे.

अनेक नागरिकांना लहान मुलांना अपघाताचा सामना करावा लागला प्रशासनाने जीवितहानी होण्यापूर्वी रस्त्याची निर्मिती करावी यासह अनेक समस्यांचा पाढा शहर प्रमुख अतिश अहिर यांनी अधिकाऱ्यांपुढे वाचून दाखवला. ठराविक वेळेत नागरिकांच्या समस्यांचे निराकरण न झाल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करून न्याय मिळवून देऊ अशी तीव्र प्रतिक्रिया शहर प्रमुख आतिश अहिर यांनी व्यक्त केली.

निवेदन देतेवेळी शिवसेना शहरप्रमुख आतिश अहिर सह दीपचंद जी किराय सुनील चित्ते, चंदन अहीर, बजरंग चरपटे,अतिश चरपटे, निलेश आसोलकर, राम मासोतकर, प्रवीण परिवाले यासह स्थानिक नागरिक आणि शिवसैनिक उपस्थित होते.

## टँकरच्या टायरमध्ये अडकला दुचाकीस्वार

**विदर्भ केसरी। उमरखेड :**

रेल्वे कॅम्पसाठी डिझेल घेऊन जाणाऱ्या टँकरने खंडाळा ते मुळावा मार्गावरील इनापूर फाट्यानजीक शनिवारी रात्री दुचाकीला धड़क दिली. यात दुचाकीस्वाराचे शीर धडापासून वेगळे होऊन टँकरच्या टायरमध्ये अडकले.

राहुल ढगे (२७, रा. सांडवा-माडवा) असे मृताचे नाव आहे. ढगे हा लोणदरी येथील यात्रा आटोपून एमएच २९ बीएन ४६५७ क. दुचाकीने गावी येत असताना एमएच ३०-बीडी ०३७५ क्र. टैंकरने दुचाकीला धडक दिली. यात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. या घटनेनंतर टैंकर चालकाने पळ काढला. टैंकर थेट उमरखेड तालुक्यातील गंगनमाळ फाटा असलेल्या रेल्वे कॅम्पमध्ये आणून उभा केला. चालक पसार झाला.

## बकऱ्या शेतात गेल्याच्या कारणावरून महिलेला लाठीकाठीने मारहाण.

### कासवी येथील घटना, तिघांवर गुन्हा दाखल.

**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर तालुका प्रतिनिधी.**



शेतात बकऱ्या गेल्याच्या किरकोळ कारणावरून एका महिलेला शिवीगाळ करत लाठीकाठीने बेदम मारहाण केल्याची घटना कासवी ता. मुर्तिजापूर येथील शेतशिवारात घडली. याप्रकरणी मुर्तिजापूर शहर पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रेखा सुधीर धायगोळे वय ३५, रा. कासवी,या मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास त्यांच्या बकऱ्या आरोपींच्या शेतात गेल्या आणि तिथे असलेले कुटार खाऊ लागल्या. याच कारणावरून आरोपींनी वाद उकरून काढला.

मारहाण आणि धमकी: आरोपी श्रीकृष्ण शामराव इंगोले याने "तुझ्या बकऱ्या इथे कशा काय आल्या?" असे म्हणून रेखा धायगोळे यांना शिवीगाळ केली आणि मातीचा ढेकूळ फेकून मारला. त्यानंतर आरोपी गजानन शामराव इंगोले याने फिर्यादीला पकडून ठेवले, तर श्रीकृष्ण इंगोले याने हातातील लाठीने रेखा यांच्या डाव्या हाताच्या दंडावर आणि पायावर जबर मारहाण केली. यावेळी तिसरा आरोपी शुभम श्रीकृष्ण इंगोले याने देखील घटनास्थळी येऊन फिर्यादीला "जे करायचे ते करून घे" अशी धमकी देत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. या घटनेनंतर पीडित महिलेने मुर्तिजापूर शहर पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून आणि मेडिकल सर्टिफिकेटच्या आधारे आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ११४(१), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अनिल राठोड ब.नं. १०२६ करत आहेत. सदरचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पोलीस हवालदार योगेश लोणकर ब.नं. २७२ यांनी पार पाडली.

# प्रदीर्घ काळापासून रिक्त असलेली पदे तात्काळ भरा

## नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने नांदगाव खंडेश्वर यांची मागणी : अग्निशमन विभागात रिक्त पदांचे ग्रहण

**विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर ( तालुका प्रतिनिधी )**






नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीच्या अग्निशमन विभागातील फायरमन आणि इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांची प्रदीर्घ काळापासून रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याची मागणी करण्यात येत आहे. शहरात आग व इतर आपत्कालीन परिस्थितीत तत्पर सेवा देण्यासाठी तीन पाळ्यांमध्ये कामकाज सुरळीत चालण्यासाठी कंत्राटी तत्त्वावर किंवा थेट भरतीद्वारे पदभरती करणे गरजेचे झाले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीच्या आस्थापनेवरील फायरमन व इतर पदे रिक्त आहे.

नगर पंचायतीचे क्षेत्राचा विस्तार झपाट्याने होत आहे. वाढते शहरीकरण आणि लोकसंख्या लक्षात घेता नागरी सुविधांवरील ताणही वाढत आहे. विशेषत : आपत्कालीन परिस्थिती आणि आग लागण्याच्या घटनांमध्ये त्वरित प्रतिसाद देण्यासाठी अग्निशमन विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु, अत्यंत खेदाने नमूद करावे लागते की, सध्या नगर पंचायतीमध्ये फायरमन (अग्निशामक) आणि इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. यामुळे खालील समस्या उद्भवत आहेत. आग लागल्यास वेळेवर मदत पोहोचवण्यात अडचणी येत आहेत. मर्यादित कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे.आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण झाला आहे.राज्यात अनेक महानगरपालिका आणि नगर परिषदांमध्ये रिक्त पदे कंत्राटी भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्या धर्तीवर आपल्या नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीमध्येही तातडीने फायरमन आणि संबंधित तांत्रिक पदांसाठी त्वरित भरती प्रक्रिया राबवण्यात यावी.

तोपर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून कंत्राटी पद्धतीने अनुभवी ( डिप्लोमा होल्डर ) कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.अग्निशमन दलासाठी आवश्यक अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.नगर पंचायत प्रशासनाने या गंभीर विषयाची त्वरित दखल घेऊन जनहितासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी सौ.प्रांजली राहुल गुल्हाने नगरसेविका प्रभाग क्रमांक १४ नांदगाव खंडेश्वर यांनी मुख्याधिकारी साहेब यांना केली आहे

## महावितरणचा वीजचोरांना शॉक

**विदर्भ केसरी।**

महावितरणच्या वर्धा मंडलाने वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध आपली मोहीम अधिक तीव्र केली असून, एप्रिल ते डिसेंबर 2025 या नऊ महिन्याच्या कालावधीत महावितरणच्या स्थानिक तांत्रिक विभागाने केलेल्या धडक कारवाईत एकूण 612 ठिकाणी थेट वीजचो-या उघडकीस आणल्या आहेत.

याशिवाय ज्या कारणासाठी वीज घेतली त्याव्यतिरिक्त इतर कारणासाठी अनधिकृत वापर करणाऱ्या 16 ग्राहकांवरही कार्यवाही करीत एकूण 591 ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महावितरणच्या या मोहिमेमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले असून, प्रामाणिक ग्राहकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.

या नऊ महिन्यांच्या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील तब्बल 1 हजार 48 ग्राहकांच्या वीज यंत्रणेकडील तपासणी करण्यात आली. त्यापैकी 612 ग्राहकांनी तब्बल 77 लाख 37 हजार रुपयांच्या 3 लाख 90 हजार 520 युनिट्सची वीज चोरल्याचे स्पष्ट झाले आहे. यापैकी या चोरीच्या बदल्यात महावितरणने नियमानुसार देयके आणि तडजोडीपोटी 16.48 लाखांचा दंड असा एकूण 93.85 लाखाचे देयक संबंधित ग्राहकांना आकारला आहे.

या मोहिमेत वीजचोरीचे अत्यंत प्रगत आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आले आहेत. कारवाई करण्यात आलेल्या ग्राहकांपैकी 290 जणांनी थेट मुख्य वीज वाहिनीवर 'आकडा' टाकून चोरी केली होती. मात्र, उर्वरित 322 ग्राहकांनी तांत्रिक छेडछाडीचा मार्ग अवलंबला होता. यामध्ये मीटरमध्ये फ़ेरफ़ार करुन ते दुरूनच बंद करणे, मीटरच्या मागील बाजूस सूक्ष्म छिद्र पाडून रोध (Resistance) निर्माण करणे, मीटर संथ करण्यासाठी अंतर्गत सर्किटमध्ये बदल करणे किंवा मीटर पूर्णपणे बंद पाडणे अशा 'अफलातून' क्लुप्त्यांचा समावेश आहे. याशिवाय, ज्या कारणासाठी वीज घेतली त्याव्यतिरिक्त इतर कारणासाठी अनधिकृत वापर करणाऱ्या 16 ग्राहकांवरही कारवाई करून 2.20 लाखांची देयके आकारण्यात

दैनिक विदर्भाचा मानबिंदू विदर्भ केसरी TODAY
चंद्रपूर
GOOD MORNING

## किल्ला पाहिल्यानंतर पोहण्याचा मोह बेतला जीवावर, सख्ख्या भावांचा कालव्यात बुडून मृत्यू

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

भंडारा जिल्ह्यातून एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आणि ऐतिहासिक वारसा अनुभवण्यासाठी गेलेल्या दोन तरुण भावांवर काळाने घाला घातला आहे. तुमसर तालुक्यातील प्रसिद्ध अंबागड किल्ला पाहिल्यानंतर, जवळच असलेल्या बावनथडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यात आंघोळीसाठी उतरले असता, पाण्याचा अंदाज न आल्याने दोन सख्ख्या भावांचा बुडून मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना शनिवारी दुपारी घडली. मिळालेल्या माहितीनुसार, जागेश्वर वाढीवे (वय २९) आणि दीपक वाढीवे (वय २६) अशी मृत भावांची नावे आहेत. हे दोघेही लाखनी तालुक्यातील रामपुरी येथील रहिवासी होते. वाढीवे बंधू आपल्या मित्रांसह गोंड राजांच्या काळातील ऐतिहासिक अंबागड किल्ला पाहण्यासाठी तुमसर तालुक्यात आले होते. गोंडकालीन ऐतिहासिक वारसा पाहिल्यानंतर, जवळूनच वाहणाऱ्या बावनथडी कालव्याच्या पाण्याचा मोह त्यांना आवरला नाही. उन्हाचा कडाका आणि प्रवासाचा थकवा घालवण्यासाठी दोन्ही भावांनी कालव्यात आंघोळीसाठी उडी घेतली. मात्र, कालव्यातील पाण्याचा वेग प्रचंड होता. पाण्याचा अंदाज न आल्याने दोघेही गटांगळ्या खाऊ लागले आणि बघता बघता पाण्याच्या प्रवाहात बेपत्ता झाले.

## संक्षिप्त



### मेळघाटात 'ट्रॅक अँण्ड ट्रेल'ने पर्यटन विकासाला चालना:जिल्हाधिकारी येरेकर यांची अँडव्हेंचर क्लबसोबत चर्चा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

मेळघाटातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. या पर्यटकांसाठी सध्याच्या पर्यटन स्थळांव्यतिरिक्त जंगल भ्रमंती आणि निसर्गाशी एकरूप होण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी 'ट्रॅक अँण्ड ट्रेल'साठी नवीन मार्ग शोधले जातील, असे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी म्हटले आहे. मेळघाट अँडव्हेंचर क्लबने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात मेळघाटातील पर्यटनाबाबत सादरीकरण केले. विदर्भातील वन पर्यटनासाठी मेळघाट हा एक उत्तम पर्याय आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटनस्थळांच्या विकासासोबतच विविध पर्यटन पर्याय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यामध्ये जंगल सफारी, साहसी पर्यटन आणि जंगल भ्रमंतीचा समावेश आहे. वन विभागाने पर्यटकांची सुरक्षितता लक्षात घेऊन ट्रेकिंगसाठी योग्य मार्ग निवडावेत. आवश्यकतेनुसार या ठिकाणी स्वतंत्र प्रवेशद्वार उभारण्यात यावे. अशा प्रकारचे विविध पर्याय दिल्यास पर्यटक मेळघाटात अधिक काळ थांबण्यास प्रवृत्त होतील, असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. पर्यटनाच्या प्रसिद्धीसाठी युवकांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्यामार्फत समाजमाध्यमांवरून मेळघाटाची माहिती प्रसारित करावी. यामुळे मेळघाटाबद्दल अधिक माहिती पोहोचण्यास मदत होईल. शालेय विद्यार्थी आणि समूहाने येणाऱ्या पर्यटकांवर विशेष लक्ष केंद्रित करून त्यांच्यासाठी निवास, फिरणे आणि जेवणाची उत्तम व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. पर्यटकांच्या निवासाची व्यवस्था उच्च दर्जाची असावी, तसेच स्वच्छता आणि नीटनेटकेपणा राखला जावा. सेमाडोह आणि कोलकास येथील निवास व्यवस्था आणि त्यांची देखभाल, दुरुस्ती सातत्याने करावी. इतर ठिकाणी तंबूमध्ये राहण्याची व्यवस्था करण्याचा पर्यायही तपासून पाहण्यात यावा. आमझरी येथे साहसी खेळांची सोय करण्यात आली असून, तेथेही पर्यटक येतील याचे नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. सुविधा आणि सवलती दिल्यास पर्यटकांचा मेळघाटातील पर्यटनाकडे कल वाढू शकेल. यासाठी पर्यटनाचे क्षेत्र विस्तारण्याची गरज आहे. धबधबे आणि ऐतिहासिक वास्तू ही केंद्रे ठरवून पर्यटकांना तेथे पायी नेण्यासाठी मार्ग तयार करावेत. या वाटेत नाश्ता, जेवण आदी व्यवस्था झाल्यास पर्यटकांसाठी एक चांगली सुविधा निर्माण होऊ शकेल. वन विभागाने पर्यटकांना राहण्याच्या व्यवस्थेसोबतच जंगल भ्रमंतीसाठी रस्ते शोधावेत, असे निर्देशही जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिले.

### तेल खरेदीत नफ्याचे आमिष; महिलेची अडीच कोटींची फसवणूक

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे : कच्चे तेल खरेदीत चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका महिलेची २ कोटी ५४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी दुबईत वास्तव्य करणाऱ्या तिघांसह एकूण नऊ जणांविरुद्ध बाणेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका ३६ वर्षीय महिलेने बाणेर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, पूनम विशाल शेळके, विनायक महादेव शेळके, सुरेखा महादेव शेळके (तिघे रा. दुबई), वैशाली हनुमंत फडतरे (वय ४९, रा. आंबेगाव बुद्रुक), हनुमंत लक्ष्मण फडतरे, रितिका हनुमंत फडतरे, ऐश्वर्या ओंकार लोंढे, तसेच अल्फा माईंड सोल्यूशन्स आणि इन्फोसेस सोल्यूशन्स या कंपन्यांच्या संचालकांचा आरोपींमध्ये समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला मूळच्या सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथील आहेत. दोन वर्षांपूर्वी त्यांची आरोपींशी ओळख झाली होती. आरोपींनी त्यांना बाणेर भागातील कार्यालयात बोलावून घेतले आणि कच्चे तेल खरेदी-विक्रीत पैसे गुंतवल्यास कमी कालावधीत चांगला नफा मिळेल, असे आमिष दाखवले. इतरांना अल्पावधीत कशाप्रकारे गुंतवणुकीवर फायदा मिळत आहे हे दाखवून त्यांनी त्यांचा विश्वास संपादन केला. या आमिषाला बळी पडून महिलेने वेळोवेळी आरोपींना २ कोटी ५४ लाख ८४ हजार रुपये दिले. मात्र, गुंतवणूक केल्यानंतर आरोपींनी महिलेला कोणताही परतावा दिला नाही.


# कमी दराने ठेका घेऊन होतेय निकृष्ट दर्जाचे काम

## गडचिरोली नगरपालिकेतील रस्ते कामात भ्रष्टाचाराचा प्रयत्न उघड ; नगराध्यक्षा प्रणोती निबोरकर यांची दखल, ठेकेदाराला तंबी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गडचिरोली नगरपालिकेच्या हद्दीत 42 टक्के कमी दराने रस्त्याच्या कामाचा ठेका घेऊन अंदाजपत्रकानुसार काम न करता निकृष्ट दर्जाचे काम करण्याचा प्रयत्न एका ठेकेदाराने केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. कमी दरात ठेका मिळवून त्यामध्ये 'गोड बंगाल' करून जास्त नफा कमावण्याच्या उद्देशाने कामात तडजोड केली जात असल्याचे निदर्शनास आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. सदर ठेकेदार रस्त्याचे काम अंदाजपत्रकात नमूद केलेल्या परिमाणानुसार तसेच अटी - शर्तीनुसार न करता काम करत असल्याचे आढळून आले. या ठिकाणी काही विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता, काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याची सत्यता स्पष्ट झाली. याबाबतची तक्रार तातडीने नगराध्यक्षा अॅड. प्रणोती निंबोरकर यांच्याकडे करण्यात आली. तक्रारीची दखल घेत नगराध्यक्षा प्रणोती निंबोरकर यांनी कोणताही विलंब न करता स्वतः घटनास्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली. पाहणीदरम्यान कामात गंभीर त्रुटी आढळून आल्याने त्यांनी संबंधित ठेकेदाराला चांगलीच तंबी देत अंदाजपत्रकानुसार आणि नियमानुसारच काम करण्याचे स्पष्ट आदेश दिले. नगराध्यक्षा यांनी यावेळी ठाम शब्दांत इशारा देताना सांगितले की, "अंदाजपत्रकाप्रमाणे दर्जेदार काम झाले नाही, तर संबंधित ठेकेदाराचे बिल अदा केले जाणार नाही. तसेच गरज पडल्यास ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करण्यात येऊन त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल." या कामाचा ठेकेदार समीर काटवे असून, तो आपल्या एका नातेवाईक असलेल्या नगरसेवकाच्या पाठबळावर या रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार करण्याचा प्रयत्न करीत असल्याची चर्चा शहरात सुरु आहे. कमी दराने ठेका मिळवून इतर ठेकेदारांशी स्पर्धा करण्याच्या नादात निकृष्ट दर्जाचे काम करण्यात येत असल्यामुळे गडचिरोली नगरपालिकेत गुणवत्ता नसलेल्या कामांचा सपाटा सुरु झाला आहे का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ठेकेदार आपल्या नातेवाईकाच्या भरोशावर मनमानी करत असल्याची माहिती मिळताच नगराध्यक्षा प्रणोती निंबोरकर यांनी कोणताही भेदभाव न करता तातडीने कारवाई करत ठेकेदाराला बोलावून स्पष्ट सूचना दिल्या. नियमानुसार व दर्जेदार काम न झाल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा कडक इशाराही त्यांनी दिला. या प्रकरणामुळे गडचिरोली शहरातील विकासकामांच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासन यापुढे अशा प्रकारांवर कितपत कठोर भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.





## घुग्घुसमध्ये पत्रकार शब्बीर सिद्दिकी यांच्यावर गुन्हा

### खंडणीचे आरोप फेटाळत पोलिसांना कायदेशीर नोटीस

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

घुग्घुस (चंद्रपूर): घुग्घुस पोलीस ठाण्यात एका कोळसा व्या वसायिकाच्या तक्रारीवरून पत्रकार शब्बीर सिद्दिकी यांच्यावर खंडणी आणि ब्लॅकमेलिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, हे सर्व आरोप बनावट असून आपल्याला खोट्या प्रकरणात अडकवण्याचा हा डाव असल्याचा दावा सिद्दिकी यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी आपल्या वकिलामार्फत पोलीस प्रशासनाला कायदेशीर नोटीस बजावली आहे.

नेमके प्रकरण काय?

मिळालेल्या माहितीनुसार, एका कोळसा व्यावसायिकाने दिलेल्या तक्रारीच्या आधारे घुग्घुस पोलिसांनी शब्बीर सिद्दिकी यांच्यावर गुन्ह्याची नोंद केली. तक्रारदाराचा आरोप आहे की, सिद्दिकी यांनी त्यांना ब्लॅकमेल करून खंडणी मागितली. या प्रकरणावर ठाणेदार प्रकाश राऊत यांनी माहिती दिली की, "तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे."

शब्बीर सिद्दिकी यांचा पलटवार

आपल्यावरील आरोप फेटाळताना शब्बीर सिद्दिकी म्हणाले की, "मी तक्रारदाराला कधीही भेटलो नाही आ णि पैशांची मागणीही केली नाही. ठो स पुराव्याशिवाय हा एफआयआर के वळ मला बदनाम करण्यासाठी आणि खऱ्या आरोपींना वाचवण्यासाठी दाखल करण्यात आला आहे."

> “ तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल झालेला आहे सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे.
> — **प्रकाश राऊत,**
> ठाणेदार, घुगुस.

कायदेशीर नोटीसमध्ये केलेले प्रमुख दावे:

पुराव्यांची मागणी: तक्रारदाराने केलेले आ रोप सिद्ध करण्यासाठीचे सर्व पुरावे सार्वजनिक करण्यात यावेत.

द ड पशाहीचा प्रयत्न: मोठ्या कोळसा घो टाळ्यातील प्रभावशाली व्यक्तींना वा च वण्यासाठी स्वतंत्र पत्रकारितेचा ग ळा आवळण्याचा हा प्रयत्न आहे.

व रिष्ठांकडे दाद: सिद्दिकी यांनी या प्रकरणाची तक्रार विशेष पोलीस महानिरीक्षक (नागपूर), पोलीस अधीक्षक चंद्रपूर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपूर यांच्याकडे केलेली आहे

या घटनेमुळे माध्यम वर्तुळात आणि पत्रकार संघटनेमध्ये चिंतेचे वातावरण आहे लोकशाही सत्य उघड करणाऱ्या पत्रकारावर अशा प्रकारे दबाव टाकणे हे लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचे मत व्यक्त होत आहे अनेक पत्रकार संघटनांनी या प्रकरणाची निपक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे

कोळसा व्यवसायातील व्यवसायातील आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी हा कट रचला गेला की काय? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे आता सर्वांचे लक्ष पोलीस तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेकडे लागले आहे.

## धनेगाव सरपंच निलुताई अजय येवले पदावर कायम; अप्पर आयुक्तांनी तक्रारदाराचा अर्ज फेटाळला

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रेमदास तायडे



अंजनगाव सुर्जी प्रतिनिधी अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी पंचायत समिती अंतर्गत धनेगाव येथील सरपंच सौ. निलुताई अजय येवले यांचे सरपंचपद कायम ठेवण्यात आले असून, त्यांच्या अपात्रतेसाठी दाखल करण्यात आलेला अर्ज अप्पर आयुक्तांनी अमान्य ठरवत फेटाळून लावला आहे.


धनेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच मुकुंद प्रभुदास येवले यांनी सरपंच सौ. निलुताई येवले यांना अपात्र ठरविण्यासाठी अमरावती विभागीय आयुक्तांकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सरपंच व उपसरपंच हे एकाच गटातील असले तरी, ग्रामपंचायतीतील अंतर्गत मतभेद व सरपंचपदावरून निर्माण झालेल्या वादामुळे गेल्या काही वर्षांपासून अविश्वास प्रस्ताव व विविध तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. झेंडावंदनाच्या प्रकरणात तसेच दलित वस्तीतील बौद्ध मंदिरासमोरील काँक्रिट रपटा बांधकामाबाबत सरपंचांविरोधात तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, या दोन्ही प्रकरणांत चौकशीअंती कोणतेही ठोस तथ्य आढळून आले नाही. परिणामी, दोन्ही वेळा न्यायालयाने सरपंच सौ. निलुताई येवले यांच्या बाजूने निकाल दिला होता. यानंतरही उपसरपंच मुकुंद येवले यांनी अप्पर आयुक्तांकडे पुन्हा दाद मागितली होती. दोन्ही बाजूंचा सखोल युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर अप्पर आयुक्त, अमरावती यांनी सरपंचपद कायम ठेवण्याचा निर्णय देत तक्रारदाराचा अर्ज अंतिमतः फेटाळून लावला आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी काही वृत्तपत्रांत सरपंच पायउतार झाल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मात्र, त्या बातम्यांना पूर्णतः छेद देत अप्पर आयुक्तांनी सुधारित आदेश जारी केला आहे. आदेश क्रमांक दि. १६/०१/२०२६ नुसार अर्जदार क्रमांक १ यांची तक्रार अंतिम चौकशीत अमान्य ठरविण्यात आल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. या आदेशाची प्रत मा. नायब तहसीलदार, अंजनगाव सुर्जी तसेच ग्रामपंचायत सचिव प्रवीण साखरे यांना देण्यात आली असून, सरपंच सौ. निलुताई येवले यांनी ही माहिती दिली आहे. त्यामुळे धनेगाव ग्रामपंचायतीत सरपंचपदावर निलुताई येवले कायम असल्याची अधिकृत शिक्कामोर्तब झाली आहे.

## मोर्शी-अमरावती महामार्गावर बसच्या धडकेत मजूर ठार

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

मोर्शी-अमरावती महामार्गावर सावरखेड ते गोराळा दरम्यान एका एसटी बसच्या धडकेत एका मजुराचा जागीच मृत्यू झाला. मोनू उईके (वय ४५, रा. पिंपरीढाणा, ता. भैसदेही, जि. बैतुल, मध्यप्रदेश) असे मृत मजुराचे नाव आहे. या घटनेनंतर बसचालक विशाल अमझरे याने अपघातग्रस्त बस शिरखेड पोलीस ठाण्यात जमा केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोर्शी तालुक्यातील सावरखेड येथील मोर्शी-अमरावती महामार्गावरील पेट्रोल पंपाजवळ




थ्रेशर मशीनवर काम करणारे काही मजूर ट्रॅक्टरमध्ये डिझेल भरण्यासाठी थांबले होते. मोनू उईके हा त्या वेळी मुख्य रस्त्यावर उभा होता.

अमरावतीहून मोर्शीकडे जाणाऱ्या एका एसटी बसने त्याला धडक दिली. या धडकेत मोनू उईके याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्याला तात्काळ मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर बसचालक विशाल अमझरे याने स्वतः अपघातग्रस्त बस शिरखेड पोलीस ठाण्यात जमा केली. शिरखेड पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## कागदांवरच अडकून पडली 10 प्राथमिक आरोग्य केंद्रे

### ग्रामीण आरोग्य सेवेचा विस्तार थांबला; शासनमान्यतेची प्रतीक्षा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांना गावाजवळ आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने जिल्हा आरोग्य विभागाने नव्या दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांचे प्रस्ताव शासनाकडे पाठवले; मात्र मंजुरीअभावी प्रस्ताव रखडल्याने आरोग्य सेवेच्या विस्ताराला खीळ बसली आहे.

जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार मोठा असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर उपचार मिळणे कठीण जाते. ही अडचण लक्षात घेऊन जिल्हा परिषद आरोग्य विभागाने नव्या दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्थापनेचे प्रस्ताव शासन दरबारी सादर केले. या प्रस्तावांना बराच कालावधी उलटूनही अद्याप मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे ग्रामीण आरोग्य सेवेच्या विस्तारावर अनिश्चिततेचे सावट आहे. सध्या जिल्ह्यात शासकीय रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, नागरी भागात आयुष्यमान आरोग्य वर्धिनी केंद्रे आणि 'आपला दवाखाना' योजना कार्यान्वित आहे. तरीही वाढती लोकसंख्या आणि विस्तीर्ण अंतर यामुळे उपलब्ध सुविधा अपुऱ्या पडत आहेत. किरकोळ आजारांवर उपचारासाठीही अनेकांना खासगी रुग्णालयांचा पर्याय निवडावा लागत आहे. नव्या प्रस्तावित केंद्रांमुळे विद्यमान प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांशी संलग्न गावे जवळच्या ठिकाणी जोडली जाणार होती. त्यामुळे नागरिकांना नजीक उपचार मिळावेत, हा मुख्य उद्देश होता. मात्र शासनस्तरावर निर्णय रखडल्याने या योजनेची अंमलबजावणी लांबणीवर पडली आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे. पाच इमारतींचे बांधकाम आहे प्रगतिपथावर दरम्यान, जिल्ह्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारती सुसज्ज करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती व आदिवासी उपयोजनेतून निधी उपलब्ध झाला आहे. मुकूटबन, शिबला, फुलसावंगी, माळकिन्ही आणि बोरीअरब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या नव्या इमारतींचे बांधकाम सुरू असून, प्रत्येकी सुमारे सात कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

## टोम्पे महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे श्रीक्षेत्र नागरवाडी येथे थाटात उद्घाटन

### विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर जपून करावा : ठाणेदार अशोक जाधव

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

चांदूरबाजार (तालुका प्रतिनिधी ) तालुक्यातील गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेचे निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तकग्राम विस्रोळी ग्रामपंचायत अंतर्गत श्री संत गाडगेबाबा आश्रम शाळा, श्रीक्षेत्र नागरवाडी येथे 01 फेब्रुवारी ते 08 फेब्रुवारी 2026 दरम्यान संपन्न होत आहे. या निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन सोहळा आज दिनांक 2 फेब्रुवारी 2026 रोजी चांदूरबाजार पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री अशोक जाधव साहेब यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके, श्री बापूसाहेब देशमुख, विसरोळी




गावच्या सरपंच सौ. मनीषाताई इंगळे, श्री संत गाडगेबाबा आश्रम शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश अवघड, उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर गव्हाळे, प्रकाश इंगळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण परिमल, डॉ. प्रिया देवळे, डॉ. लालबा दुमटकर प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कर्मयोगी संत गाडगे महाराज व स्वर्गीय गोविंदरावदादा टोम्पे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून डॉ. प्रवीण परिमल यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे महत्त्व विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगितले. तर ठाणेदार श्री अशोक जाधव यांनी राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचे रीतसर उद्घाटन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर हे खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांवर संस्कार घडविण्याचे काम करते. मी स्वतः राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातूनच घडलेला असून राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करते. कोणतेही काम मनापासून केले पाहिजे. माणूस हा आपल्या प्रामाणिक, निस्वार्थी कामामुळे ओळखला जातो. विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचन करावे. पुस्तक वाचनाने माणसं मोठी होत असतात. याबरोबरच सोशल मीडिया ही दुनिया अभासी असून यावर विद्यार्थ्यांनी जास्त विश्वास ठेवू नये. विशेषतः आपला जोडीदार निवडताना विचारपूर्वक निवडावा. अलीकडच्या काळात तरुण मुलीची सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात फसवणूक होताना दिसते. मोबाईलमुळे आपली कोणतीही वैयक्तिक प्रायव्हसी राहिलेली नसून सोशल मीडियामुळे आपल्यावर प्रत्येकाची नजर आहे तेव्हा विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर जपून करावा असे मोलाचे मार्गदर्शन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके यांनी विद्यार्थ्यांना संत गाडगे महाराजांचे विचार आपल्यात कृतीतून रुजवले पाहिजेत. तरुण पिढी ही देशाचे भविष्य असून या निवासी शिबिरातून आपण चांगले संस्कार घेऊन जावे अशा शुभेच्छा दिल्या तसेच यावेळी उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर गव्हाळे, विसरोळी गावच्या सरपंच सौ. मनीषाताई इंगळे, श्री संत गाडगे महाराज आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रकाश अवघड यांनीही आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विशेषतः मुख्याध्यापक श्री प्रकाश अवघड यांनी विद्यार्थ्यांना या अशा शिबिरातून विद्यार्थी हा बौद्धिक, सामाजिक, मानसिक, शारीरिक दृष्ट्या परिपक्व होतो असे म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मयुरी नाईक हिने केले तर आभार कु. प्राची नाईक हिने मानले. या निवासी श्रमसंस्कार शिबिराकरिता स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या तसेच या श्रमसंस्कार शिबिराच्या यशस्वीतेकरिता मुख्य व सह कार्यक्रमाधिकारी बरोबरच शिक्षकेतर कर्मचारी श्री सुधीर मकासरे, श्री गोपाल सुरकार यांनी परिश्रम घेतले.

दैनिक विदर्भ केसरी TODAY

गडचिरोली

GOOD MORNING

## वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या रामधीन कोराम यांना वन विभागाकडून 50 हजार रुपयाची आर्थिक मदत

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : कुरखेडा तालुक्यातील जांभूळखेडा येथील रामधीन झाडुराम कोराम यांच्यावर दिनांक २४/१२/२०२५ ला बिबट या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झाले होते. आज त्यांना वनविभागाकडून ५०,००० हजार रुपयाचा धनादेश देण्यात आला. त्याप्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी एल. एम. गोपुळवाड वन क्षेत्र सहाय्यक एस .एल कंकलवार, एस डब्ल्यू गोन्नाडे वनरक्षक कुरखेडा, कु. एस. एन. वालदे वनरक्षक जांभुळखेडा व एम. के. दुधबळे वनरक्षक वडेगाव हजर होते. यावेळी रामधीन कोराम यांनी वन विभाग व महाराष्ट्र शासनाचे मनापासून आभार मानले आहे.



## संक्षीप्त



### जगद्गुरू संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा जन्मोत्सव व स्नेहमीलन सोहळा संपन्न..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : येथील कुनबी समाज सेवा समीतीच्या नियोजीत प्रांगणात गडचिरोली शहरातील असंख्य कुनबी समाज बांधव एकत्रीत येऊन जगद्गुरू संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा जन्मोत्सव व स्नेहमीलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या जन्मोत्सव व स्नेहमीलन सोहळ्याचे औचित्य साधून समाज बांधवांच्या सहकार्याने रक्तदान शिबीर, रक्तगट, रक्तदाब, मधुमेह तपासणी शिबीर तसेच दंत चिकित्सा व नेत्र तपासणी शिबीर अशाप्रकारे आरोग्य तपासणी कार्यक्रम राबविण्यात येऊन बहुतांश समाज बांधव तसेच माता भगिनींच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर जगद्गुरू संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी काढण्यात आली व सदर पालखी ही कुनबी समाज सेवा समितीच्या नियोजित जागेवरुन काढण्यात आली व शिवाजी महाविद्यालय - रेड्डी गोडाऊन चौक - चामोर्शी रोड - ईंदीरा गांधी चौक - कुनबी समाज सेवा समितीच्या नियोजित प्रांगणाकडे अशाप्रकारे पालखीचा सोहळा पार पडला. त्यानंतर प्रबोधनपर कार्यक्रमामध्ये वक्ते म्हणून मा.नितेश खोमणे सर(PSI) तसेच मा.राजश्री नितेश गोहणे यांनी आपली विशेष उपस्थिती लावली व जगद्गुरू संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांवर आधारित खुप छान असे वक्तव्य मा.राजश्रीताई गोहणे यांनी केले. तसेच कुनबी समाज सेवा समीतीचे अध्यक्ष मा.ॲड.संजयजी ठाकरे,व कुनबी समाज बांधवांकडून नगरपरिषद गडचिरोली च्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा मा.प्रनोतीताई सागर निंबोरकर यांच्या समवेत नवनिर्वाचित नगरसेवकांचे सत्कार करण्यात आले. त्याचप्रमाणे समाजातील सत्र २०२५ मध्ये इ.१० वी व १२ वी मधील विद्यार्थी तसेच शासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार व जगद्गुरू संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या प्रतीष्ठापनेकरीता भुमीपुजनाचे कार्यक्रम पार पाडुन स्नेह भोजनाचा कार्यक्रम पार पाडण्यात आले.

### पुण्यात मोटारीतून सोडण्याचा बहाणा करुन तरुणाला लुटले

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे शहरातील नगर रस्ता परिसरात एका तरुणाला मोटारीतून लिफ्ट




देण्याच्या बहाण्याने लुटण्यात आले. मोटार चालक आणि त्याच्या चार साथीदारांनी तरुणाला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत ऑनलाइन पद्धतीने 18 हजार रुपये काढून घेतले. या प्रकरणी येरवडा येथील लक्ष्मीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवार पेठेतील नरपरतगिरी चौकात राहणारा तक्रारदार तरुण 30 जानेवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास नगर रस्ता परिसरात पुणे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनाची वाट पाहत थांबला होता. त्यावेळी एका मोटारीतून आलेल्या आरोपींनी त्याला पुणे स्टेशनपर्यंत सोडण्याची बतावणी केली. मोटारीत बसल्यानंतर मोटार चालक आणि त्याच्या साथीदारांनी तरुणाला मारहाण केली. त्याला नगर रस्ता आणि बंडगार्डन रस्ता परिसरातून फिरवण्यात आले. आरोपींनी तरुणाला जीवे मारण्याची धमकी देऊन त्याच्याकडून ऑनलाइन पद्धतीने 18 हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. त्यानंतर आरोपींनी तरुणाला रस्त्यात सोडून मोटारीसह पळ काढला. घाबरलेल्या तरुणाने पोलिसांकडे तक्रार दिली असून, सहायक पोलिस निरीक्षक नंदनवार या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# ग्रामीण रुग्णालय एटापल्ली येथे रुग्ण सुरक्षेचा प्रश्न

## डॉक्टरांच्या वर्तनाबाबत प्रशासनाकडे तक्रार

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



एटापल्ली : ग्रामीण रुग्णालय एटापल्ली येथे उपचार घेत असलेल्या एका रुग्णाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, या घटनेच्या पार्श्वभूमीवर कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांच्या वर्तनाविरोधात प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. स्थानिकांनी संबंधित आरोग्य प्रशासनाकडे निवेदन सादर करून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे ग्रामीण रुग्णालयातील रुग्ण सुरक्षा व्यवस्था, कर्तव्यपालन आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याच्या यंत्रणेबाबत चर्चा सुरू झाली आहे. तक्रारीनुसार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास ग्रामीण रुग्णालय एटापल्ली येथे उपचार घेत असलेला एक रुग्ण मानसिक अस्वस्थतेच्या अवस्थेत रुग्णालयाच्या आवारातून बाहेर पडला. काही वेळानंतर संबंधित रुग्ण हनुमान मंदिर परिसरात आरडाओरडा करत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या लक्षात आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नागरिकांनी तात्काळ हस्तक्षेप करत त्या रुग्णाला सुरक्षितरीत्या ताब्यात घेत पुन्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयासारख्या संवेदनशील आणि जबाबदारीच्या ठिकाणाहून रुग्ण बाहेर जाणे ही बाब अत्यंत गंभीर मानली जात असून, या घटनेमुळे रुग्णांच्या देखरेखीबाबत असलेल्या यंत्रणेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. या घटनेनंतर रुग्ण बाहेर कसा गेला, याबाबत कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांकडे विचारणा करण्यात आली. या संदर्भात डॉक्टरांनी उत्तर देताना असंवेदनशील भूमिका घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, डॉक्टरांच्या उत्तरामुळे उपस्थित नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त झाली. रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद सौजन्यपूर्ण व जबाबदार असणे अपेक्षित असते, मात्र या प्रकरणात तसे न झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारीत पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, काही वेळानंतर पुन्हा रुग्णालयात गेल्यावर संबंधित डॉक्टर आपल्या कक्षात उपस्थित नसल्याचे आढळून आले. फोनद्वारे संपर्क साधल्यावर त्यांनी वैयक्तिक कारणे सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवा तत्काळ उपलब्ध राहते की नाही, याबाबत शंका व्यक्त करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील रुग्णालयांवर मोठ्या प्रमाणावर सामान्य नागरिक अवलंबून असतात. त्यामुळे अशा ठिकाणी रुग्ण सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या संपूर्ण घटनेच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण रुग्णालयातील व्यवस्थापन, रुग्ण सुरक्षेची पद्धत, कर्मचाऱ्यांची उपस्थिती, तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कर्तव्यपालन याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी आवश्यक त्या सुधारात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच रुग्णालयातील सेवा अधिक सक्षम व संवेदनशील व्हाव्यात, यासाठी प्रशासनाने योग्य पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, या तक्रारीची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी, संबंधित सर्व बाबींची वस्तुनिष्ठ चौकशी करावी आणि चौकशीअंती नियमांनुसार योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाकडे आरोग्य विभाग कसा प्रतिसाद देतो, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.



## मरेगांव परीसरात रानटी हत्तींचा धुमाकूळ

### तूर-मका व कडधान्य पिकांचे मोठे नुकसान

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : तालुक्यातील मरेगांव परीसरात रानटी हत्तींच्या कळपाने अक्षरशः धुमाकूळ घातल्याने सदर परिसरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. मागील दहा दिवसांपासून मरेगांव व चांभार्डा परिसरात रानटी हत्तींचा वावर सातत्याने वाढत असून तूर, लाखोळी, मका, उडीद व मूग या पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस सुरू आहे. त्यामुळे आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे संकटात सापडलेले शेतकरी आता हत्तींच्या प्रकोपाचा सामना करतांना दिसत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, खरीप हंगामात धान पिकांची नासधूस केल्यानंतर रानटी हत्ती आता रब्बीपूर्व पिकांवर तुटून पडले आहेत. शनिवारी रात्री हत्तींच्या कळपाने चांभार्डा येथील शेतकऱ्यांच्या शेतात घुसखोरी करत तूर पिकावर जोरदार डल्ला मारला. या वेळी अनेक शेतांतील उभे पीक हत्तींच्या पायाखाली तुडवून पूर्णतः उद्ध्वस्त करण्यात आले. काही ठिकाणी हत्तींच्या कळपाने पीक उपटून फेकल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या या प्रकारामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीचे पीक काही क्षणांतच नष्ट झाल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. सततच्या हत्तींच्या वावरामुळे परिसरातील गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, रात्रीच्या वेळी शेतात जाणे धोकादायक बनले आहे.

दरम्यान, रानटी हत्तींचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून त्यांना लवकरात लवकर नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी जोरदार मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात तालुक्यात आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## घरकुल लाभार्थी व स्थानिक वापरासाठी गडचिरोली तालुक्यात वाळू वाटप सुरू ; ऑनलाईन अर्ज करण्याचे तहसीलदार सागर कांबळे यांचे आवाहन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे



गडचिरोली : शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील घरकुल लाभार्थ्यांना आणि स्थानिक नागरिकांना स्वतःच्या बांधकामासाठी वाळू उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया गडचिरोली तालुक्यात वेगाने सुरू आहे. महसूल विभागाच्या ८ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार ही सुविधा पुरविण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार सागर कांबळे यांनी दिली आहे. "घरकुल लाभार्थ्यांसाठी 'झिरो रॉयल्टी' सुविधा_ घरकुल योजनेअंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना बांधकामासाठी कमाल ५ ब्रासपर्यंत वाळू विनामूल्य (० रॉयल्टी) उपलब्ध करून दिली जात आहे. यासाठी लाभार्थ्यांना महाखनिज पोर्टलवर ऑनलाईन पासेस उपलब्ध करून दिले जात आहेत. "स्थानिक वापरासाठी वाळूची उपलब्धता_ ज्या स्थानिक नागरिकांना स्वतःच्या घराच्या बांधकामासाठी वाळू हवी आहे, त्यांना शासनाकडे स्वामीत्वधन (रॉयल्टी), जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी व इतर आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानंतर वाळू उपलब्ध करून दिली जाईल. बांधकामाचा आराखडा विचारात घेऊन आवश्यक परिमाणात वाळूचे पासेस ऑनलाईन दिले जातील. "अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे: वाळू मागणीसाठी अर्जदारांनी 'महाखनिज' (Maha-Khanij) या संगणक प्रणालीवर खालील कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे: मालमत्ता पत्रक किंवा गट नंबरचा उतारा. आधार कार्ड. बांधकामाचा मंजूर आराखडा. ग्रामपंचायत क्षेत्रासाठी: ग्रामसेवकाचा वाळू मागणी प्रमाणीकरण दाखला. वाळूचा वापर फक्त स्वतःच्या वैयक्तिक कामासाठीच करणार असल्याचे स्वयंघोषणापत्र. आतापर्यंतचे वाटप व सद्यस्थिती.. गडचिरोली तालुक्यात सन २०२५-२६ या वर्षासाठी एकूण १,२२३ घरकुल लाभार्थ्यांकरिता ६,११५ ब्रास वाळू देण्याचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंतचे वितरण: ८२० लाभार्थ्यांना १,६४१ ब्रास वाळूचे वाटप पूर्ण झाले आहे. पुढील नियोजन: उर्वरित ४,४७४ ब्रास वाळूसाठी रॉयल्टी असे पासची मागणी करण्यात आली असून, पास प्राप्त होताच सर्व पात्र लाभार्थ्यांना तत्काळ वाळू वाटप करण्यात येईल. "तालुक्यातील पात्र घरकुल लाभार्थ्यांनी आणि स्वतःचे बांधकाम करणाऱ्या नागरिकांनी कागदपत्रांची पूर्तता करून महाखनिज पोर्टलवर अर्ज करावा.

## परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : राज्य मंडळ, कार्यालय पुणे यांचे मार्फत फेब्रु/मार्च - 2026 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) लेखी परिक्षा दिनांक 10 फेब्रुवारी 2026 ते दि.18 मार्च 2026 व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) लेखी परिक्षा दिनांक 20 फेब्रुवारी 2026 ते दि.18 मार्च 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे.

परिक्षा केंद्रावर परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पडतील व तेथील परिक्षार्थींना तणावमुक्त वातावरणात परिक्षा देणे शक्य होईल अशी व्यवस्था करावी म्हणून सदर परिक्षा केंद्रांच्या परिसरात 200 मीटर अंतरापर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहितेचे कलम 163 अन्वये मनाई हुकुम जारी करणे हे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता आवश्यक झाले आहे. त्या अनुषंगाने जिल्हादंडाधिकारी, अविश्यांत पंडा यांना प्राप्त अधिकाराअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये सदर परिक्षा सुरळीतपणे व पारदर्शकपणे पार पाडण्याच्या दृष्टीने सदर परिक्षा केंद्राच्या 200 मिटर अंतरापर्यंत पुढीलप्रमाणे बाबी/कृत्ये करण्यास मनाई आदेश जारी केले आहे. परीक्षा केंद्राचे परिसरात प्रवेश करतेवेळी पाच पेक्षा जास्त व्यक्ती परिक्षार्थी व परीक्षार्थी संबंधित अधिकारी व कर्मचारी वगळून एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाही. परीक्षा केंद्राचे परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल. असे कृत्य करण्यात येणार नाही. निषिद्ध क्षेत्रात झेरॉक्स मशीन, पानपट्टी, टायपिंग सेंटर, फॅक्स व एस टी डी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे परिक्षा कालावधीत सुरु राहणार नाही. परिक्षा केंद्रात व परिसरात मोबाईल फोन, लॅपटॉप, पेजर, टेपरेकॉर्डर, कॅमेरा इत्यादींचा वापर करता येणार नाही. निषिद्ध क्षेत्रात नारेबाजी करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, भाषण करणे, घोषणा करता येणार नाही. शस्त्र, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, सुरे, काठ्या किंवा लाठया किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी इतर कोणतीही वस्तु बरोबर ठेवता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेता येणार नाही. परिक्षा केंद्रापासून 200 मीटर अंतरावर चुन्याची लाईन आखण्यात यावी. सदर आदेश कर्तव्य बजावणारे वरिष्ठ अधिकारी, आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तैनात करण्यात आलेले वरिष्ठ पोलिस अधिकारी यांना लागू राहणार नाही. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी परिक्षेच्या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होणार नाही या दृष्टीने सुक्ष्म नियोजन करून आवश्यक पोलीस बंदोबस्त लावण्याची कार्यवाही व जबाबदारी पार पाडावी. सदर अधिसूचनेतील कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध फौजदारी नियमांतर्गत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. सदर अधिसूचना परिक्षेच्या दिनांकास सकाळी 08.00 वाजेपासून ते सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत अमलात राहील असे जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली अविश्यांत पंडा यांनी कळविले आहे.

## चौथीतील चिमुकल्याचा गळफास लागून मृत्यू

### आत्महत्या की अन्य कारण? कोचबी गावात हळहळ...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

आरमोरी : आरमोरी तालुक्यातील कोचबी येथे चौथीतील एका विद्यार्थ्याचा गळफास लागून मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी व हृदयद्रावक घटना रविवारी सायंकाळी उघडकीस आली. कोचबी येथील जिल्हा परिषद शाळेत चौथ्या वर्गात शिक्षण घेणारा संस्कार विनोद कन्नाके (वय 10 वर्षे) हा बालक आपल्या राहत्या घरी गळफास लागलेल्या अवस्थेत आढळून आला.

प्राप्त माहितीनुसार, संस्कारचे आई-वडील पोटाची खडगी भरण्यासाठी शेजारच्या तेलंगणा राज्यात मजुरीसाठी गेले होते. घरात कोणीही नसल्याने संस्कार एकटाच राहत होता. रविवारी सायंकाळी सुमारे 4.30 वाजताच्या सुमारास ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासातून समोर येत आहे. या घटनेची माहिती मिळताच कोचबीच्या पोलीस पाटील माधुरी सहारे यांनी तात्काळ आरमोरी पोलीस ठाण्याला कळविले. माहिती मिळताच आरमोरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करण्यात आला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.

दरम्यान, हा मृत्यू आत्महत्येमुळेच झाला, की यामागे काही अन्य कारण आहे, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. एवढ्या लहान वयातील बालकाने टोकाचे पाऊल उचलणे अनेक प्रश्न निर्माण करणारे असल्याने पोलीस सर्व बाजूंनी तपास करीत आहेत. या घटनेमुळे कोचबी गावात शोककळा पसरली असून, चिमुकल्या संस्कारच्या अकाली मृत्यूने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास आरमोरी पोलीस करीत आहेत.

## आमदार मसरामांची शेतकऱ्यांसह धान खरेदी केंद्रांवर धडक

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

देसाईगंज (गडचिरोली) : शासनाने धान उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावे व आर्थिक स्थिती बळकट व्हावी, या उद्देशाने शासकिय हमीभाव धान खरेदी केंद्रे सुरु केली. मात्र, अद्याप गोदामे भरल्याची कारणे पुढे करून सहकारी संस्थांनी धान खरेदी बंद केल्याने जवळपास ५० टक्के शेतकरी धान विक्रिपासून वंचित राहणार असल्याची बाब आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रामदास मसराम यांच्या कानावर पडताच धान खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करण्यात यावी, यासाठी स्वतः पुढाकार घेत शेतकऱ्यांसह धान खरेदी संस्थेच्या कार्यालयावर धडक दिली. देसाईगंज तालूक्यातील सहकारी खरेदी-विक्री संस्थेच्या माध्यमातुन ५ हजार २०७ शेतकरी बांधवांनी खरिप हंगामाचे धान विक्री करिता ऑनलाईन अर्ज प्रक्रिया पुर्ण केली आहे.

या पैकी आजच्या तारखेपर्यंत २ हजार ५२६ शेतकऱ्यांनी ९५ हजार ७२४ क्विंटल धान खरेदी केंद्रावर विक्री केला असून सुमारे २२ कोटी ६७ लाख ७० हजार १५६ रुपयांचे धानाचे चुकारे दोन महिने लोटूनही जमा करण्यात आलेले नाही. एवढेच नव्हे तर तब्बल २ हजार ७१९ शेतकरी अजूनही धान विक्री पासून वंचित असल्याने खुल्या बाजारात प्रति क्विंटल ४०० रुपयापेक्षा जास्त दर तूटवडा असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होईल, याबाबतची बाब लक्षात येताच आमदार मसराम यांनी शेतकऱ्यांसह धान खरेदी संस्थेचे कार्यालय गाठून संपुर्ण माहीती जाणून घेत पणन व्यवस्थापक किरण गाडे, गडचिरोली, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा,



जिल्हा पणन व्यवस्थापक तिवाडे यांचेशी भ्रमनध्वनिवर चर्चा केली. व जिल्ह्यातील तसेच विधानसभा क्षेत्रातील एकही शेतकरी धान विक्रिपासून वंचित राहू नये यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात व ज्या शेतकरी बांधवांनी आजच्या तारखे पर्यंत धान विक्री केली आहे; अश्या शेतकऱ्यांचे धानाचे चुकारे तात्काळ बैंक खात्यात जमा करावे, जेणेकरुन रब्बी हंगामात शेतकऱ्यांना धान लागवडीला अडचणींचा सामना करावा लागू नये. प्रकरणी जिल्हाधिकारी पंडा यांनी सकारात्मक प्रतिसाद देत धान खरेदी केंद्रे पूर्ववत सुरु करण्याची ग्वाही दिली. यावेळी धनपाल मिसार, नगरसेवक श्याम उईके, पुंडलिक घोडाम, दुर्वास नाईक, परशूराम ठाकरे, सुनिल मेश्राम, प्रमोद पिलारे, पुंडलिक तलमले, हिरामण गराटे, ज्ञानदेव पिलारे, सागर वाढई यांचेसह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**